cmyk

## संपादकीय

### देवीची पूजा पण जिवंत महिलेला न्याय कधी?

भारत आज जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल इंडिया, चंद्रयान, जी-२० अध्यक्षपद, जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने वाटचाल आणि ''विश्वगुरू'' होण्याची महत्त्वाकांक्षाया सर्व गोष्टींचा आपण अभिमान बाळगतो. संसदेत महिलांच्या सक्षमीकरणाच्या घोषणा होतात, योजनांची यादी मांडली जाते आणि ''नारीशक्ती''चा जयघोष केला जातो.

दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-११९ | रविवार दि.१९ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### खा.अभिषेक बॅनर्जींच्या कार्यालयावर बुलडोजर

कोलकाता : तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव आणि लोकसभा खासदार अभिषेक बॅनर्जी यांचे अमताला येथील कार्यालयावर शनिवारी बुलडोजर चालवण्यात आला. जिल्हा प्रशासनाने ही पाच मजली इमारत कोणत्याही परवानगीशिवाय आणि बांधकाम नियांचे उल्लंघ करून बांधल्याचा आरोप केला आहे. मोठ्या पोलीस बंदोबस्तात बुलडोजरच्या सहाय्याने ही करावाई करण्यात आली, यासाठी बंगाल पोलीस आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस फोर्स यांचा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. त्याचबरोबर अग्निशमन अन् आपत्कालीन विभागाचे देखील कर्मचारी या ठिकाणी उपस्थित होते. अभिषेक बॅनर्जी यांच्याशी निगडीत हे कार्यालय अमताला इथे आहे. हे कार्यालय बॅनर्जी यांच्या डायमंड हार्बग लोकसभा मतकदर संघात येते. दरम्यान, ज्यावेळी ही इमारत पाडण्यात येत होती त्यावेळी भाजप कार्यकर्ते आजूबाजूला जमा झाले होते. त्यांनी जल्लोष साजरा करत पक्षाच्या समर्थनार्थ घोषणाबाजी देखील केली.

### अभिनेता आमिर खानला बिश्नोईची धमकी

मुंबई: सोशल मीडिया पोस्ट आणि ऑनलाइन समोर आलेल्या एका ऑडिओ क्लिपनुसार, अभिनेता आमिर खानला गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईच्या टोळीतील सदस्यांकडून धमकी मिळाली आहे. लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अझू बिश्नोई याने टायसन बिश्नोई नावाच्या दुसऱ्या व्यक्तीसोबत सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हायरल पोस्टनुसार, आमिर खानला इशारा देण्यात आला आहे. ऑडिओ क्लिपमध्ये, अझू बिश्नोईने आमिर खानवर 'लव्ह जिहाद'ला प्रोत्साहन दिल्याचा आरोप केला आहे, आणि दावा केला आहे की हे भारतीय संस्कृतीच्या विरोधात आहे. त्याने अभिनेत्याला इशारा दिला आहे की अशा कृती सहन केल्या जाणार नाहीत. तो म्हणाला, ''आमिर खानसारखे जे लोक आपल्या देशात 'लव्ह जिहाद'च्या नावाखाली आमच्या संस्कृतीच्या विरोधात असलेल्या गोष्टींना प्रोत्साहन देत आहेत.

### उद्योगांना जमीन देताना व्यवहार्यता तपासा:फडणवीस

मुंबई: 'महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अंतर्गत औद्योगिक वसाहतींमधील जमिनीचे मागणीनुसार वितरण करताना व्यवहार्यता तपासूनच जमीन देण्यात यावी. यामध्ये तर्कसुसंगत अशी पद्धती विकसित करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. तसेच, उद्योगांबाबत सर्व परवानगींसाठी मैत्री पोर्टलचाच उपयोग बंधनकारक करण्याच्याही सूचना केल्या. 'वर्षा' निवासस्थानी उद्योग विभागाच्या विविध धोरणांच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस उद्योगमंत्री उदय सामंत उपस्थित होते. औद्योगिक वसाहतीत उद्योगांसाठी मागणीनुसार जमिनीचे वितरण करताना व्यवहार्यता तपासूनच निर्णय घेण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. तसेच, सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांचे सखोल सर्वेक्षण करून या क्षेत्राची उत्कृष्ट परिसंस्था निर्माण करावी. हे सर्वात मोठे रोजगारनिर्मितीचे क्षेत्र असल्यामुळे त्याच्या विकासासाठी काम करावे. एमएसएमई उद्योगांचे सर्वेक्षण करताना त्यांची सद्यस्थिती, रोजगारनिर्मितीची क्षमता, सध्या असलेली रोजगारनिर्मिती आणि उत्पादन या सर्वांचा अभ्यास करण्यात यावा. मीडिया अँड अरेना धोरणामध्ये मोठी 'कन्व्हेन्शन सेंटर' उभारण्यासाठी व्यवसाय सुलभता असावी. यामुळे राज्यातील मोठ्या शहरांमध्ये कन्व्हेन्शन सेंटर निर्माण होतील. धोरणाची अंमलबजावणी करताना ती उद्योग साहाय्यकारी ठरेल याची यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याची सरकारला बुध्दी दे!

## विठ्ठलाकडे साकडे, पंढरपुरात शेतकऱ्यांची सद्बुध्दी दिंडी

पंढरपूर । प्रतिनिधी

**प्रस्तावित नागपूर- गोवा शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी शनिवारी पंढरपुरात भरपावसात सद्बुध्दी दिंडी काढण्यात आली. तसेच इसबावी येथे बाधित शेतकऱ्यांचा मेळावाही पार पडला. शेतकऱ्यांचा विरोध असलेला, गरज नसलेला शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याची सरकारला सद्बुद्धी मिळावी, असे विठुरायाला साकडे घालण्यात आले. शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीने ही दिंडी आयोजित केली होती.**

यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आमदार जयंत पाटील, विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार कैलास पाटील, अमित देशमुख, माजी मंत्री महादेव जानकर, राजन क्षीरसागर, गिरीश फोंडे, के. के. पाटील यांच्यासह शेतकरी संघर्ष समितीचे पदाधिकारी, महाविकास आघाडीतील नेते आणि विविध शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही दिंडी पायी चालत वाखरी येथून निघाली. ती पुढे मार्गस्थ होऊन थेट श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरापर्यंत पोहोचली. राज्य सरकारला शेतकऱ्यांच्या भावना समजून घेऊन हा प्रकल्प रद्द करण्याची सद्बुध्दी द्यावी, असे विठ्ठलाकडे साकडे घालण्यात आले. आम्ही विठ्ठलाला साकडे घालतोय की महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना सद्बुध्दी द्यावी आणि त्यांनी हा शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा, अशी भावना जयंत पाटील यांनी व्यक्त केली. सर्व बाधित




जिल्ह्यातील शेतकऱ्यांची इच्छा आहे की, हा गरज नसलेला महामार्ग आहे. हा महामार्ग रद्द करावा म्हणून आम्ही विठ्ठलाला साकडे घालतोय की मुख्यमंत्री ज्यावेळी पूजेसाठी येतील तेव्हा त्यांना सद्बुद्धी मिळावी आणि हा महामार्ग रद्द करण्याचा निर्णय त्यांनी पंढरपुरात जाहीर करावा, अशी आमची अपेक्षा असल्याची प्रतिक्रिया सतेज पाटील यांनी दिली. शक्तिपीठ महामार्गाविरोधातील आंदोलन आता निर्णायक टप्प्यावर पोहोचले आहे. या आंदोलनाची धग सरकारपर्यंत तीव्रपणे पोहोचण्यासाठी आंदोलनाचा हा वणवा असाच तेवत ठेवला पाहिजे. शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि गरज नसलेला हा महामार्ग कायमचा रद्द करण्यासाठी आम्ही शेवटपर्यंत शेतकरी बांधवांसोबत ठामपणे उभे राहू, अशी ग्वाही पाटील यांनी शेतकऱ्यांना दिली. मुख्यमंत्र्यांना जर सद्बुध्दी मिळाली नाही तर त्याची किंमत चुकती करावी लागेल, असा इशारा राजू शेट्टी यांनी यावेळी सरकारला दिला. मुठभर उद्योगपतींच्या फायद्यासाठी २० हजार एकर बागायती जमिनी शक्तिपीठ महामार्गासाठी संपादित करण्याची ▶▶ पान २ वर

# सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी चादरीआड फरफटत नेले!

## राहुल गांधीं यांच्यासह अनेकांच्या संतप्त प्रतिक्रिया,आंदोलन अधिक तिव्र

दिल्ली । वृत्तसंस्था

दिल्ली पोलिसांनी गेल्या २० दिवसांपासून दिल्लीच्या जंतर मंतरवर उपोषणावर असलेल्या पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना बळजबरीने उचलून चादरीआड नेत सफदरजंग रुग्णालयात दाखल केले. नीट घोटाळ्यात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी वांगचुक हे कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) समर्थनार्थ उपोषण करत होते. पोलिसांनी बळजबरीचे समर्थन करताना सांगितले की, त्यांची ढासळती प्रकृती, वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला आणि दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे ही कारवाई करण्यात आली आहे.



शनिवारी पहाटे, साध्या वेशातील पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने जंतर मंतर येथे दाखल झाले आणि त्यांनी संपूर्ण परिसर सील केला. त्यानंतर सोनम वांगचुक यांच्याभोवती चादरीचे पडदे लावण्यात आले आणि त्यांना बळजबरीने उचलून सफदरजंग रुग्णालयात नेण्यात आले. यादरम्यान, सीजेपीच्या कार्यकर्त्यांनी निदर्शने केली, घोषणाबाजी केली, पण पोलिसांनी कार्यकर्त्यांची सुद्धा धरपकड सुरु केली. त्याच वेळी, कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनाही ताब्यात घेण्यात आले. ''दिल्ली पोलिसांनी मला मारहाण केली ▶▶ पान २ वर

### आता अभिजीत दिपके करणार आमरण उपोषण

दिल्लीतील जंतर मंतरवर नीट पेपर फुटी प्रकरणी केंद्रीय मंत्री धर्मेश प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी गेल्या २१ दिवसांपासून आमरण उपोषणावर बसलेल्या सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलीसांनी उचलून नेले आहे. त्यानंतर आता कॉक्रोज जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी ते स्वतः आमरण उपोषणावर बसणार आहेत असे जाहीर केले आहे. दरम्यान, कॉक्रोज जनता पार्टीच्या अधिकृत ट्विटर हँडलवरून सोनम वांगचुक यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन रूग्णालयात दाखल केल्यावर एक पोस्ट करण्यात आली आहे. त्यात पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके हे आता आमरण उपोषण करणार असून २० जुलै रोजी चलो संसद हा मोर्चा जसा ठरला होता तसा तो होणार आहे अशी देखील माहिती देण्यात आली आहे.

# एफडीएची म्हशीच्या गोठ्यावर धाड!

## जास्त दुधासाठी दिली जाणारी शेकडो ऑक्सिटोसिन इंजेक्शन्स जप्त



मुंबई । प्रतिनिधी

राज्यात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्नातील भेसळ आणि बेकायदेशीर औषधांचा वापर करणाऱ्यांविरोधात धडक मोहीम सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर उल्हासनगरमध्ये एक मोठी कारवाई समोर आली आहे. म्हशींचे दूध उत्पादन वाढवण्यासाठी बेकायदेशीरपणे दिली जाणारी आणि शासनाने बंदी घातलेली तब्बल ६१२ ऑक्सिटोसिन इंजेक्शन्स एफडीएच्या पथकाने जप्त केली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, उल्हासनगर कॅम्प क्रमांक ३ मधील ओटी सेक्शन, ▶▶ पान २ वर

# अर्थखात्यावरून शिवसेना-राष्ट्रवादीत घमासान !

## शिंदेंचा विरोध तर राष्ट्रवादी आग्रही, महायुतीत तणाव

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याच्या मंत्रिमंडळ विस्ताराच्या पार्श्वभूमीवर अर्थखात्यावरून महायुतीत पडद्यामागील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्ष अर्थखाते मिळावे, यासाठी आग्रही असून, या संदर्भात पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा होणार असल्याची माहिती आहे. दुसरीकडे, अर्थखाते राष्ट्रवादीकडे देण्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विरोध असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.**



सूत्रांच्या माहितीनुसार, दिल्ली दौऱ्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या सोबत झालेल्या चर्चेतही शिंदे यांनी अर्थखाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे देण्यास विरोध दर्शवल्याचे सांगितले जात आहे. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थखाते स्वतःकडे ठेवले होते. मात्र,अलीकडे जयंत पाटील यांनी मुख्यमंत्र्यांची घेतलेली भेट आणि शरद पवार यांच्या नेतृत्वा खालील राष्ट्रवादी काँग्रेस एनडीएमध्ये सहभागी होण्याच्या चर्चांमुळे अर्थखाते शरद पवार गटाकडे जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर महायुतीत अर्थखात्यावरून मोठी रस्सीखेच सुरू असल्याचे बोलले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार याच मुद्द्यावर मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा नियोजित दिल्ली दौरा अचानक रद्द झाला आहे. ते सकाळी महाराष्ट्र सदनातील कार्यक्रमाला ऑनलाइन उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले. दौरा रद्द होण्यामागील नेमके कारण अधिकृतरीत्या स्पष्ट करण्यात आलेले ▶▶ पान २ वर

# जिल्हाधिकारी-आमदार यांच्यातील वाद मंत्री पंकजा मुंडे बैठक सोडून निघून गेल्या

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांची अनेक कामे जिल्हाधिकाऱ्यांकडून वेळेवर होत नसल्याच्या कारणावरून शनिवारी जिल्हा नियोजन समिती आणि जिल्हा आढावा बैठकीमध्ये आमदार नारायण कुचे यांनी जिल्हाधिकारी मित्तल यांना जाब विचारला. जिल्हाधिकाऱ्यांनीही तसेच उत्तर दिले. मात्र शाब्दिक चकमक सुरू झाली आणि शेवटी पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी बैठकीतून काढता पाय घेत बैठकीच्या बाहेर आल्या.

शनिवार दि. १८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जालना जिल्ह्याचा विकास आराखडा यावर चर्चा आणि नियोजन समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये आमदार नारायण कुचे यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे बोट ▶▶ पान २ वर




### बैठक झाल्यानंतरचा प्रकार

जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली या बैठकीत ५४७ कोटी ९७ लाखाच्या आराखड्याला मान्यता देण्यात आली.बैठक सपल्यानंतर काही आमदारांनी जिल्हाधिकारी यांच्या विषयी रोष व्यक्त केला. शाब्दीक चकमक वाढत असतांना पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी मध्यस्थी केली जिल्हाधिकारी व आमदार कुचे व ईतर लोकप्रतिनिधीना समजवण्याचा प्रयत्न केला या नंतरही शाब्दीक वाद सुरू राहिल्याने मंत्री पंकजा मुंडे यांनी मला पुढील कार्यक्रमाला जायचे आहे. म्हणत तेथून काढता पाय घेतला.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१८ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४.५० क्विंटल | २,३०३ | २,६०० | २,४८३ |
| ज्वारी/हायब्रिड : २२.०० क्विंटल | २,७९२ | ५,१४१ | ३,८४० |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,७७० | १,७७० | १,७७० |
| तूर : २.०० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ८.०० क्विंटल | २,५५० | २,६०१ | २,५७५ |
| मुग: १.०० क्विंटल | ७,०६० | ७,०६० | ७,०६० |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,३६० | ५,३६० | ५,३६० |

# नीटच्या निकालावर पुन्हा गंभीर प्रश्नचिन्ह !

## अन्सर की नुसार ५०० ची अपेक्षा मात्र मिळाले फक्त ९५ गुण

बीड-संभाजीनगर । प्रतिनिधी

नीट-यूजी निकालावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. कारण, बीडमधील दोन विद्यार्थ्यांनी एनटीएच्या मूल्यमापन प्रक्रियेवरच आरोप केले आहेत. एका विद्यार्थ्याला ५२२ गुण अपेक्षित असताना स्कोअरकार्डवर अवघे ९५ गुण मिळाले, तर दुसऱ्या विद्यार्थिनीला ७०२ पेक्षा अधिक गुण अपेक्षित असताना केवळ ८७ गुण मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. या निकालानंतर पालक न्यायासाठी




हायकोर्टात जाण्याच्या तयारीत आहेत. मात्र, या घटनेमुळे पुन्हा एकदा परीक्षेच्या नीटनेटकेपणावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

देशातील नीट परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर पुन्हा नव्याने नीट परीक्षा घेण्यात आली. परीक्षेचा निकाल १६ जुलै रोजी जाहीर झाला. देशात आणि राज्यात अव्वल गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घरी सेलीब्रेशन सुरू झाले. मात्र, बीडच्या सोहम गवतेच्या कुटुंबावर जणू दुःखाचा डोंगरच कोसळला. उत्तरपत्रिका आणि अन्सर की तपासल्यानंतर ५२२ गुण मिळतील, अशी खात्री असलेल्या सोहमच्या स्कोअरकार्डवर मात्र अवघे ९५ गुण दिसले. निकाल पाहिल्यानंतर काही वेळ तो कोणाशीच बोलला नाही आणि गवते कुटुंबीयांच्या घरात अश्रूंचा बांधच फुटला. मुलाने रात्रंदिवस ▶▶ पान २ वर

### एनटीएच्या मुल्यांकनावरच प्रश्नचिन्ह

पेपरफुटीनंतर आधीच वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या नीट परीक्षेला आता गुणांतील कथित तफावतीची भर पडली आहे. बीडमधील दोन विद्यार्थ्यांच्या तक्रारींमुळे एनटीएच्या मूल्यांकन प्रक्रियेवरच प्रश्न उपस्थित झाले आहेत. या विद्यार्थ्यांना न्याय मिळणार का आणि एनटीए या आरोपांवर काय उत्तर देणार, याकडे देशभरातील लाखो विद्यार्थी आणि पालकांचे लक्ष लागले आहे.

# उद्धव ठाकरे यांना धक्का

## फुटलेल्या सहा खासदारांना शिंदेंच्या शिवसेनेत विलिनीकरणाला मंजुरी

दिल्ली । वृत्तसंस्था



ठाकरेंच्या शिवसेनेतून बंडखोरी करत शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा दिलेल्या सहा फुटीर खासदारांबाबत लोकसभा सचिवालयाने एक मोठा निर्णय घेतला आहे. या सहा फुटीर खासदारांच्या गटाच्या विलिनीकरणाला मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंचे सहा खासदार आता शिंदेंच्या शिवसेनेचे अधिकृत खासदार बनले आहेत.

ठाकरेंच्या शिवसेनेचे ओमराजे निंबाळकर, संजय दिना पाटील, संजय देशमुख, संजय जाधव, भाऊसाहेब वाकचौरे, नागेश पाटील आष्टीकर या सहा खासदारांनी वेगळा गट स्थापन केला. नंतर या गटाने शिंदेंच्या शिवसेनेत विलिनीकरण केलं. आता या विलिनीकरणावर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी शिक्कामोर्तब केलं ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# देवीची पूजा पण जिवंत महिलेला न्याय कधी?

भारत आज जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल इंडिया, चंद्रयान, जी-२० अध्यक्षपद, जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने वाटचाल आणि ''विश्वगुरू'' होण्याची महत्त्वाकांक्षाया सर्व गोष्टींचा आपण अभिमान बाळगतो. संसदेत महिलांच्या सक्षमीकरणाच्या घोषणा होतात, योजनांची यादी मांडली जाते आणि ''नारीशक्ती''चा जयघोष केला जातो. पण या घोषणांच्या गदारोळात एक अस्वस्थ करणारा प्रश्न सतत उभा राहतो. भारतातील प्रत्येक महिला खरोखर सुरक्षित आहे का? तिला न्याय वेळेत मिळतो का? आणि आपण देवीची पूजा जितक्या श्रद्धेने करतो, तितक्याच प्रामाणिकपणे जिवंत महिलेचा सन्मान करतो का?

भारतीय संस्कृतीत ''यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः'' हा विचार हजारो वर्षांपासून सांगितला जातो. दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती यांच्या रूपाने स्त्रीला शक्ती, संपन्नता आणि ज्ञानाचे प्रतीक मानले जाते. परंतु दुसऱ्या बाजूला राष्ट्रीय गुन्हे नोंदवहीची आकडेवारी महिलांविरुद्ध दरवर्षी मोठ्या प्रमाणावर गुन्हे नोंदवले जात असल्याचे दर्शवते. कौटुंबिक हिंसा, बलात्कार, लैंगिक अत्याचार, छेडछाड, ॲसिड हल्ले, सायबर स्टॉकिंग, मानवी तस्करी आणि ऑनलाइन छळ अशा गुन्ह्यांचे प्रमाण समाजासमोर गंभीर प्रश्न उभे करते. प्रत्येक तक्रार म्हणजे दोष सिद्ध झाला, असे नसले तरी इतक्या मोठ्या प्रमाणावर महिला न्यायासाठी दार ठोठावत आहेत, हे वास्तव दुर्लक्षित करता येणार नाही. २०१४ नंतर केंद्र सरकारने महिलांसाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवल्या. ''बेटी बचाओ, बेटी पढाओ'', उज्ज्वला योजना, जनधन खात्यांमधून महिलांचा आर्थिक सहभाग, स्वयं-सहाय्यता गटांचे बळकटीकरण, मुद्रा योजनांमधील महिला उद्योजक, मातृत्व लाभ आणि महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वासंदर्भातील घटनात्मक पावले ही निश्चितच सकारात्मक आहेत. अनेक राज्य सरकारांनीही महिला सुरक्षेसाठी स्वतंत्र योजना सुरू केल्या आहेत. या प्रयत्नांचे स्वागत व्हायलाच हवे. मात्र प्रश्न योजनांचा नाही; प्रश्न त्यांच्या परिणामकारकतेचा आहे. एखादी मुलगी शाळेत, महाविद्यालयात, कामाच्या ठिकाणी किंवा रात्री रस्त्यावर निर्भयपणे फिरू शकते का? एखाद्या पीडित महिलेला पोलीस ठाण्यात संवेदनशील वागणूक मिळते का? तपास वेळेत पूर्ण होतो का? न्यायालयात तिचे प्रकरण वर्षानुवर्षे अडकून राहत नाही ना? महिला सक्षमीकरणाचा खरा अर्थ या प्रश्नांच्या उत्तरांत दडलेला आहे. अलीकडेच पटना उच्च न्यायालयाच्या एका निर्णयाने देशभरात चर्चा निर्माण केली. त्या निर्णयावर महिला संघटना आणि अनेक कायदेतज्ज्ञांनी आक्षेप घेतले, तर सर्वोच्च न्यायालयानेही या प्रकरणाची दखल घेत पुढील न्यायिक विचार सुरू केला. अंतिम निर्णय न्यायालय देईल आणि त्याचा आदर करणे आवश्यक आहे. मात्र या घटनेने एक व्यापक प्रश्न पुन्हा समोर आणला. कायद्याचा अर्थ लावताना महिलेची प्रतिष्ठा, तिची सुरक्षितता आणि घटनात्मक समानतेचा विचार पुरेशा गांभीर्याने केला जातो का? हा प्रश्न न्यायालयावर टीका करण्याचा नसून न्यायव्यवस्थेवरील लोकविश्वास अधिक बळकट करण्याचा आहे. महिलांना न्याय मिळण्यात होणारा विलंब हीदेखील गंभीर समस्या आहे. न्यायालयांमध्ये प्रलंबित खटल्यांची संख्या मोठी आहे. अनेक प्रकरणांत तपासातील त्रुटी, फॉरेन्सिक अहवालांचा विलंब, साक्षीदारांचे संरक्षण आणि सरकारी यंत्रणांतील समन्वयाचा अभाव यामुळे न्यायप्रक्रिया लांबते. अशा वेळी पीडितेवर मानसिक, सामाजिक आणि आर्थिक ताण वाढत जातो. त्यामुळे महिला सुरक्षेची चर्चा करताना केवळ कठोर कायद्यांची घोषणा पुरेशी नाही; त्यांची प्रभावी अंमलबजावणी अधिक महत्त्वाची आहे. दरम्यान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे नवीन प्रकारचे गुन्हे समोर येत आहेत. डीपफेक व्हिडिओ, सायबर ब्लॅकमेल, रिव्हेंज पॉर्न, ऑनलाइन स्टॉकिंग आणि डिजिटल छळाच्या घटनांमुळे महिलांसमोरील धोके बदलत आहेत. डिजिटल भारत घडविताना डिजिटल सुरक्षिततेची भक्कम चौकट उभारणे ही आजची अत्यावश्यक गरज आहे. तंत्रज्ञानाचा वापर गुन्हेगारांपेक्षा पीडितांच्या संरक्षणासाठी अधिक प्रभावीपणे होणे आवश्यक आहे. महिला सुरक्षा हा कोणत्याही एका पक्षाचा राजकीय मुद्दा नाही. तो संविधानाने दिलेल्या समानतेच्या अधिकाराचा प्रश्न आहे. सत्ताधारी असोत किंवा विरोधक, प्रत्येकाने महिलांच्या सुरक्षेच्या प्रश्नाकडे राजकारणाच्या पलीकडे जाऊन पाहिले पाहिजे. दुर्दैवाने, अनेकदा एखाद्या संवेदनशील घटनेवर राजकीय प्रतिक्रिया अधिक दिसतात; पण पीडितेला वेळेत न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक असलेली संस्थात्मक सुधारणा मागे पडते.

आज गरज आहे ती घोषणांपेक्षा कृतीची. फास्ट ट्रॅक न्यायालये, अत्याधुनिक फॉरेन्सिक प्रयोगशाळा, पोलीस दलाचे नियमित संवेदनशीलता प्रशिक्षण, सायबर गुन्ह्यांसाठी विशेष यंत्रणा, शाळांमध्ये लैंगिक समानतेचे शिक्षण, कार्यस्थळांवरील सुरक्षित वातावरण आणि न्यायव्यवस्थेतील कार्यक्षमता वाढविण्यासाठी ठोस सुधारणाया उपाययोजनांशिवाय महिला सक्षमीकरणाचा दावा अपुरा ठरेल. भारताला खऱ्या अर्थाने ''विश्वगुरू'' व्हायचे असेल, तर आर्थिक विकासाबरोबर सामाजिक न्यायही तितकाच मजबूत असला पाहिजे. ज्या दिवशी प्रत्येक महिला निर्भयपणे जगेल, न्यायासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागणार नाही आणि देवीच्या पूजेसोबत जिवंत महिलेलाही समान सन्मान मिळेल, त्या दिवशी ''नारीशक्ती'' हा केवळ राजकीय घोषवाक्य न राहता भारताच्या संस्कृतीचे आणि संविधानाचे खरे प्रतिबिंब ठरेल.

# महसूल प्रशासनाकडून वाळू माफियांना पोसण्याचा फंडा; टेंडरच्या साठ्याच्या वाळूला प्रमिशन

## गोदावरी नदी पात्रात महसूल प्रशासन आणि वाळू माफियांच्या संगनमताने लुटीचा मोठा डाव!, गोदावरी बचाव सर्वपक्षीय समितीचा आंदोलनाचा पवित्रा



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात राक्षस भुवन या ठिकाइणाहून बोगस ओटीपीच्या आधारे महसूल प्रशासनाने वाळू उपसा केल्याचा ठपका समितीने ठेवलेला असतानाही टेंडर धारकाने टेंडर सुरू असताना केलेल्या साठ्याला वेगळी परमिशन देण्याचा व वाळू माफिया व महसूल प्रशासनाला वाळूतून सोन्याचा अंड तयार करण्याचा नवीन फंडा. टेंडरच्या काळात केलेल्या साठ्याच्या वाळूला वेगळी प्रमिशन देण्याचा प्रकार महसूल प्रशासनाकडून होत होत आहे. हा प्रकार म्हणजे दिवसाढवळ्या मिली भगतचा प्रकार तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्या संगनमताने गोदावरीची दिवसाढवळ्या लूट . महसूल प्रशासनाने साठेची दहा हजार ब्रास वाळू आलीच कुठून . गोदावरी बचाव समितीने प्रत्यक्षात साठ्याचे ठिकाणी पाहणी केली असता प्रत्यक्षात त्या ठिकाणी नाहीच मग दहा हजार बरस वाळू आली कुठून!

गेवराई तालुक्यातील बोरगाव सावरगाव गुंतेगाव येथे वाळू चे टेंडर झाले होते त्यामध्ये वर्ष भर टेंडर चालवून प्रचंड वाळू उपसा करण्यात आला .परंतु टेंडर मध्ये ९ जून पर्यंत च नदी मध्ये उपसा परमिशन असते. परंतु वाळू मधून हप्ते येण्या साठी महसूल प्रशासनाने वरिष्ठांना हाताची धरून या मिली भगत करत साठ्याच्या नावा खाली वाळू नसताना आहे हे दाखवून कारण ,वाळू बाहेर काढलेली असल्यास त्यास वेगळी परमिशन ९ जून नंतर देखील मिळते. हा प्रकार म्हणजेच दिवसाढवळ्या शासनाच्या डोळ्यात धुळफेक करत संबंधित वाळू मध्ये स्वतःचा खिसा भरून घेण्याचा प्लॅन तहसिलदार एस डि म. मंडळ अधिकारी यांनी केलेला आहे. महसूल प्रशासनाने पंचनामा करून वाळू नसताना बोरगाव येथे १० हजार ब्रास सावरगाव येथे येथे ४ हजारब्रास वाळू बाहेर काढलेली आहे असे खोटे अहवाल बनवले आहेत .आणी आता परमिशन देऊन नवीन पावती पुस्तक देण्याचा अहवाल तयार करून लुटीचा नवा गेवराई पॅटर्न तयार केला आहे. महसूल प्रशासनाने जो काही पंचनामा केला त्या पंचनाम्यातील वाळू आणि प्रत्यक्षात साठ्याची वाळू यामध्ये मोठी तफावत असताना लाखो रुपयांच्या मलिदा लाटण्यासाठी वाळू माफियांना हाताशी धरून पावसाळ्यात देखील कसे हप्ते मिळतील याची तजवीज करून ठेवली आहे . गेवराई महसुली विभागाने राक्षस भुवन या ठिकाणी व अन्य ठिकाणी मोठ्या प्रमाणात लूट केलेली असताना अजूनही त्यांचे एक प्रकारे पोट भरले नाही की काय? नियमबाह्य पंचनाम्यात वाळूसाठे वाढवले आहेत. जे की अतिशय गंभीर आहे .बोरगाव सावरगाव येथे गोदावरी समिती ने प्रत्यक्ष जाऊन जी पि एस कॅमेरा ने फोटो काढले आहेत याची माहिती जिल्हाधिकारी जोन्सन साहेब यांना गोदावरी बचाव समिती नी दिली आणी त्यात तात्काळ पंचानामा करा आणी खोटे अहवाल देणाऱ्या अधिकारी वर करावाई करा अशी मागणी देखील केली आहे नसता आंदोलन चा इशारा देण्यात आला आहे.

## लैंगिक समस्या लपवु नका...मूळ कारणावर उपचार करा-डॉ. टेकाळे



बीड । प्रतिनिधी

**अनेक वेळा यामागे मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार,मेटाबॉलिक सिंड्रोम, लठ्ठपणा, हार्मोनल बदल ,ताण-तणाव,झोपेचा अभाव आणि चुकीची जीवनशैली ही कारणे असू शकतात.**

ऑनलाईन औषधे किंवा अप्रमाणित उपचारांच्या आहारी जाऊ नका. समस्या दूर करण्यासाठी काय करु शकता? नियमित व्यायाम व संतुलित आहार,वजन नियंत्रण व किगल व्यायाम, ताण-तणाव नियंत्रण व पुरेशी झोप यामुळे अनेक रुग्णामध्ये लैंगिक आरोग्यात लक्षणीय सुधारणा होऊ शकते. चांगली चर्चा करा, ओपन डिस्कशन करा आणि प्रॉपर समुपदेशन करुन घ्या. गोपनीय समुपदेशन , योग्य तपासणी,वैज्ञानिक उपचार,जोडीदार समुपदेशन,जीवन शैली मार्गदर्शन. लैंगिक समस्या लाजेची नाही योग्य निदान आणि उपचाराची बाब आहेअसे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

## चोरी करणारे तिघे व चोरीचा माल खरेदी करणारे दोघे भंगार व्यावसायिक जेरबंद; साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त

जालना । प्रतिनिधी

**जालना जिल्हयातील चोरी व घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस अधिक्षक श्री. तेगबीर सिंह संधू यांनी पोलीस पथकाला आरोपी पकडून आणण्यासंदर्भात आदेश केले होते.**

राजुर ते भोकरदन जाणाऱ्या रोडवरील राजुरेश्वर जिनींगमधील स्टोअरमधुन ७५ लोखंडी वेट गड्डु अज्ञात चोरटयाने चोरुन नेले वगैरे मजकुराचे फिर्यादी वरुन पोलीस ठाणे हसनाबाद, जालना गुरनं. १९७/२०२६ कलम ३०३(२), ३३४(१) भान्यास प्रमाणे दाखल झाला होता. सदर गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेत असतांना मिळालेल्या माहितीचे तांत्रिक विश्लेषण व गुप्तबातमीदाराच्या मदतीने माहिती



मिळाली की, सदरचा गुन्हा हा आरोपी शाम विष्णु सन्यासी, वय-३५ वर्ष, रा. सुंदरनगर, चंदनझिरा, जालना २) लहु धोंडीराम पवार, वय-४० वर्ष, रा.सुंदरनगर, चंदनझिरा जालना ३) सय्यद अफरोज सय्यद हसन, वय-३५ वर्ष, रा. बावला पार्क, चंदनझिरा, जालना यांनी केला आहे. त्यानुषंगाने त्यांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी गुन्हयाची कबुली देवून गुन्हयातील मुददेमाल आरोपीतांनी भंगार विक्रेते ५) अन्बर खान गफुर खान, वय-४० वर्ष, रा. टड्डुपुरा, जालना ६) शेख नासेर शेख लतीफ, वय-३८ वर्ष, रा.दुःखीनगर, जुना जालना यांना विक्री केल्याचे सांगितल्याने दोन्हीही भंगार विक्रेते यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी शाम विष्णु सन्यासी, लहु धोंडीराम पवार, सय्यद अफरोज सय्यद हसन, अन्वर खान गफुर खान, शेख नासेर शेख लतीफ, आरोपीकडून जप्त मुददेमाल रु.४,००,०००/- गुन्हा करण्यासाठी वापरलेली महेद्रा बोलेरो पिकअप क्र. ४८३०८५ जु.बा.कि.अ. रु.५०,०००/- किंमतीचे गुन्हा करतांना वापरलेले आरोपीतांचे ०४ मोबाईल एकुण मुद्देमाल रु.४,५०,०००/- सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. तेगबीर सिंह संधू , मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी , मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग जालना श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने कारवाई केली.

## हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने राजेंद्र गुगळे यांचे निधन



बीड । प्रतिनिधी

**शहरातील हिरालाल चौक परिसरातील साधना मेडिकलचे संचालक तथा व्यावसायिक राजेंद्र रावसाहेब गुगळे यांचे गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने व्यापारी व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.**

राजेंद्र गुगळे हे शांत, मनमिळाऊ आणि सर्वांशी आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. त्यांच्या सौम्य स्वभावामुळे त्यांनी समाजात आपला वेगळा ठसा उमटवला होता. त्यांच्या अकाली निधनाने मित्रपरिवार, नातेवाईक तसेच सामाजिक वर्गातून शोक व्यक्त केला जात आहे. त्यांच्या पश्चात पत्नी संध्या राजेंद्र गुगळे, लहान भाऊ नरेंद्र गुगळे, पुतणे अक्षय व आकाश, तसेच मुली नेहा, निशा आणि निधी असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने गुगळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

## पान १ वरून...

### शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याची

दुर्बुद्धी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना सूचली. त्याबरोबरच या प्रकल्पातून फडणवीसांना जवळपास ५० ते ६० हजार कोटींचा ढपला पाडायचा आहे, असा आरोप त्यांनी केला. पांडुरंगाने त्यांना हा महामार्ग रद्द करण्याची सद्बुद्धी द्यावी, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, बाधित शेतकऱ्यांचा मेळावा इसबावी (पंढरपूर) येथे पार पडला. कोणीही मागणी केलेली नसताना, हजारो शेतकऱ्यांना भूमिहीन बनवणारा, राज्याला कर्जाच्या खाईत लोटणारा शक्तीपीठ महामार्ग बांधण्याचा सरकारने घाट घातला आहे. शक्तिपीठ ऐवजी सक्तीपीठ ठरत असलेला हा महामार्ग रद्द करण्यासाठी शेतकऱ्यांनी उभारलेल्या लढ्यात आपण पूर्ण शक्तीनिशी सहभागी आहे, असे मत लातूरचे काँग्रेस आमदार अमित देशमुख यांनी मेळाव्यात बोलताना व्यक्त केले.

---------------

### एफडीएची म्हशीच्य

जसलोक हायस्कूल परिसरात असलेल्या प्रकाश वाधवानी याच्या म्हशीच्या गोठ्यावर एफडीएच्या पथकाने हा छापा टाकला. या छाप्यात जास्त दुधासाठी जनावरांना टोचली जाणारी ६१२ प्रतिबंधित इंजेक्शन्स आणि त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्यांचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. ऑक्सिटोसिन या औषधाचा वापर जनावरांच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक आणि क्रूर मानला जातो. या इंजेक्शन्समुळे जनावरांना प्रचंड त्रास होतो. इतकेच नाही तर, अशा प्रकारे ऑक्सिटोसिन देऊन काढलेल्या दुधाचे सेवन केल्यास मानवी आरोग्यावर, विशेषतः लहान मुलांवर आणि गरोदर महिलांवर गंभीर दुष्परिणाम होण्याची भीती वैद्यकीय तज्ज्ञांकडून व्यक्त केली जाते. याच कारणामुळे या औषधाच्या विक्रीवर आणि वापरावर शासनाने कायद्याने पूर्णपणे बंदी घातलेली आहे. राज्यात सध्या सुरू असलेल्या विशेष मा३हिमेचा भाग म्हणून उल्हासनगरातील ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. बेकायदेशीरपणे औषधांचा साठा बाळगल्याप्रकरणी आणि जनावरांच्या आरोग्याशी खेळ केल्याप्रकरणी संबंधित गोठा चालकावर अन्न सुरक्षा आणि औषध प्रशासनाच्या कायद्यानुसार कडक कायदेशीरकारवाई करण्यात आली आहे. एफडीएच्या या धडक कारवाईमुळे उल्हासनगर आणि ठाणे जिल्ह्यातील बेकायदेशीर दुग्ध व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.

-------------

### सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी

आणि ताब्यात घेतले आहे,'' अशी पोस्ट दिपके यांनी एक्सवर केली यामुळे याठिकाणी गोंधळ निर्माण झाला. वांगचुक यांनी नागरिकांना २० जुलै रोजी नियोजित असलेल्या चलो संसद आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले होते.

**कोणतीही ताकद विद्यार्थ्यांचा आवाज दाबू शकत नाही - राहूल गांधी**

सोनम वांगचूक यांना बळजबरीने उचलण्यात आल्यानंतर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राहुल यांनी ट्विट करत म्हटले आहे की, खोटेपणा आणि हिंसाचार ही मोदी सरकारची मूलभूत तत्त्वे आहेत. सोनम वांगचुक यांना त्यांच्या शांततापूर्ण उपोषणादरम्यान जंतर मंतरवरून हटवणे चुकीचे आहे. पेपरफुटी, शिक्षणाचा वाढता खर्च आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्या हे भारताच्या भविष्याशी संबंधित अत्यंत गंभीर मुद्दे आहेत. भारताच्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या व प्रेम करणाऱ्या आम्हा सर्वांना हे मुद्दे मांडण्यापासून कोणतीही शक्ती रोखू शकत नाही.

**जबरदस्तीने उपचार नकोत - ; गीतांजली वागचुक**

''माझ्या, आमच्या कुटुंबाच्या आणि गेल्या २० दिवसांपासून त्यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवणाऱ्या डॉक्टरांच्या संमतीशिवाय सोनम वांगचुक यांना तोंडावाटे किंवा शिरेवाटे कोणतेही औषध वा उपचार दिले जाऊ नयेत,'' अशी मागणी वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली जे. अंगमो यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. गीतांजली जे. अंगमो यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, ''मी दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात आहे. येथे सोनम वांगचुक यांना दाखल करण्यात आले आहे. माझ्या, त्यांच्या कुटुंबाच्या आणि गेल्या २० दिवसांपासून त्यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवणाऱ्या डॉक्टरांच्या संमतीशिवाय त्यांना तोंडावाटे किंवा शिरेवाटे कोणतेही औषध किंवा उपचार दिले जाऊ नयेत.''

**आता नरेंद्र मोदींच्या राजीनाम्याची मागणी**

या कारवाईनंतर कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दीपके यांनी आक्रमक प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी सोशल मीडियावर आणि माध्यमांशी संवाद साधताना आंदोलन सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले. दीपके म्हणाले, ''सोनम सरांना आंदोलनस्थळावरून हटवले म्हणजे आंदोलन संपेल, असा सरकारचा समज असेल तर तो चुकीचा आहे. आम्ही आंदोलन सुरूच ठेवणार असून २० जुलै रोजी संसदेकडे नियोजित मोर्चा काढणार आहोत.'' आतापर्यंत आम्ही केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत होतो. मात्र, या कारवाईनंतर आता आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजीनाम्याचीही मागणी करू, असा दावा अभिजीत दीपके यांनी केला.

-----------------

### अर्थखात्यावरून शिवसेना-

नाही. त्यामुळे विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या बैठकीत नेमकी कोणत्या विषयावर चर्चा झाली, याची अधिकृत माहिती समोर आलेली नसली तरी या भेटीनंतर राज्यातील राजकीय हालचालींना वेग आल्याचे चित्र दिसून येत आहे. शरद पवार यांच्या पक्षाच्या संभाव्य एनडीए प्रवेशाच्या चर्चांमुळे या बैठका आणि भेटीगाठींना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. दरम्यान, अर्थखात्यावर दावा सोडण्यास अजित पवार गट तयार नसल्याचेही समजते. त्यामुळे अर्थखाते नेमके कोणाकडे जाणार, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. अधिकृत निर्णय होईपर्यंत या चर्चांना आणखी वेग मिळण्याची शक्यता आहे.

------------

### जिल्हाधिकारी-आमदार यांच्यातील वा

दाखवत आमचे अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत, त्यावर निर्णय घेतला जात नाही. आमदार कुचे यांच्यासह इतर आमदारांनी देखील जिल्हाधिकाऱ्यांच्या कामाबद्दल नाराजी व्यक्त केली. प्रारंभी जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी जिल्हाधिकारी व संबंधित लोकप्रतिनिधींना समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र शाब्दिक चकमक वाढतच गेल्याने संतापलेल्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी बैठकीतूनच काढता पाय घेतला आणि त्या थेट आपल्या वाहनापर्यंत पोहोचल्या. या आजच्या घटनेमुळे जिल्ह्यातील आमदार आणि जिल्हाधिकारी यांच्यामधील वाद टोकाला गेल्याचे समजते. प्रामुख्याने या संदर्भात भाजपाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी यासंदर्भात खुलासा करताना, पालकमंत्री यांनी सामंजस्याची भूमिका घेतली. काही आमदारांचे प्रश्न असतात, त्या प्रश्नांचा निपटारा जिल्हाधिकाऱ्यांकडून झाला नाही म्हणून काही आमदार आक्रमक झाले होते परंतु जिल्हाधिकारी आणि आमदारांना पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी समजावण्याचा प्रयत्न केला, अशी प्रतिक्रिया भाजप आमदार माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी दिली. या प्रकरणावरून जिल्ह्याची परिस्थिती पालकमंत्र्यांच्या हाताबाहेर गेल्याचा सुर उठत असताना दिसत आहे. दरम्यान, बैठकीत वाद वाढत असल्याने पालकमंत्री पंकजा मुंडे बैठक सोडून निघून गेल्या. त्यांनी जिल्हाधिकारी, लोकप्रतिनिधींना समजावण्याचा प्रयत्न केला परंतु त्याला यश न आल्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला असल्याचे बोलले जात आहे.

---------------

### उद्धव ठाकरे यांना धक्का

आहे. त्यामुळे या सहाही खासदारांची खासदारकी वाचली असून ते आता शिंदेंच्या शिवसेनेचे खासदार म्हणून काम करणार आहेत. फुटीचा सामना करावा लागलेल्या ठाकरेंच्या शिवसेनेला आणखी एक मोठा धक्का बसला. गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेतून निवडून आलेल्या सहा खासदारांनी त्यांची साथ सोडत शिंदेंच्या शिवसेनेसोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, यवतमाळचे खासदार संजय देशमुख, परभणीचे खासदार संजय जाधव, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, मुंबई दक्षिणचे खासदार संजय दिना पाटील आणि शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरेंचा समावेश आहे. यावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, ''ज्या लोकांनी या खासदारांना निवडून दिले आहे त्यांची कामं होणं महत्त्वाची आहेत. आमच्याकडे आलेल्या सहा खासदारांनी त्यांच्या मतदारसंघाच्या विकासासाठी हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्यांना मोठा विकासनिधी दिला जाईल.'' या सहा खासदारांनी आधी आपला एक वेगळा गट स्थापन केला. त्यानंतर या गटाला लोकसभा अध्यक्षांनी मान्यता दिली. नंतर या गटाने शिंदेंच्या शिवसेनेच अधिकृतपणे विलिनीकरणाचा निर्णय घेतला. या सगळ्यावर ठाकरेंच्या शिवसेनेकडून आक्षेप घेण्यात आला. मात्र अखेर लोकसभा अध्यक्षांनी या सहा खासदारांच्या विलिनीकरणाला मान्यता दिली आहे.

-----------

### नीटच्या निकालावर पुन्हा

अभ्यास केला, अनेकदा दोन-तीन तासांपेक्षा जास्त झोप घेतली नाही. वेळेवर जेवणही केले नाही. आजारी पडला तरी अभ्यास थांबवला नाही. पण, निकालाने सगळ्याच मेहनतीवर पाणी फेरल्याची भावना सोहमच्या आईने व्यक्त केली. तर, वडिलांनी ओएमआर शीट आणि अन्सर की तपासल्यानंतर मोठी तफावत आढळल्याचा दावा करत, न्याय न मिळाल्यास थेट हायकोर्टात जाणार असल्याचे सांगितले. विशेष म्हणजे हा प्रकार एकट्या सोहमबाबतच घडला असे नाही तर वडवणीतील ज्ञानेश्वरी पवार हिची कहाणीही तितकीच धक्कादायक आहे. अन्सर की नुसार तब्बल ७०२ गुण मिळतील, या विश्वासाने एम्स दिल्लीचे स्वप्न पाहणाऱ्या ज्ञानेश्वरीच्या स्कोअरकार्डवर मात्र केवळ ८७ गुण दिसले, आणि एका क्षणात टॉपर होण्याचे ज्ञानेश्वरीचे स्वप्न चक्काचूर झाले.

राज्य लोकतंत्र
नवा दिशा... नव विचार.....
रविवार, दि. १९ जुलै २०२६


## थोडक्यात



### पारगाव (जो.) येथे माजी सरपंच गणेश आबा मोकाशे यांचा वाढदिवस शालेय साहित्य वाटपाने साजरा

आष्टी : सामाजिक कार्यामध्ये नेहमी हिररीने सहभागी होणारे आणि सर्वसामान्यांचे, लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी शासन दरबारी सातत्याने यशस्वी पाठपुरावा करणारे पारगाव (जो.) गावचे माजी सरपंच, युवा उद्योजक व चेअरमन माननीय गणेश आबा मोकाशे यांचा वाढदिवस अत्यंत कौतुकास्पद आणि सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पारगाव (जो.) व जिल्हा परिषद वस्ती शाळा पारगाव (जो.) येथील शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शालेय जीवनात विद्यार्थ्यांना मदतीचा हात मिळावा आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे या उदात्त हेतूने हा स्तुत्य उपक्रम राबवून गणेश आबा मोकाशे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमाला परिसरातील आणि गावातील मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली होती. यामध्ये प्रामुख्याने ह.भ.प. अशोक महाराज भोसले, चंद्रकांत भोसले, गोविंद बळे, शहाजी भोसले, अरविंद भोसले, आत्माराम भोसले, सागर भोराडे, सविन मोकाशे, हनुमंत कदम (सर), रामेश्वर मोकाशे, किशोर बळे, दादा लिंगे, भरत मोकाशे, खंडू कदम, कृष्णा रोडे, भीमराव सावंतफुले, सचिन भोराडे यांच्यासह दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला उपस्थित सर्वच मान्यवरांनी आणि ग्रामस्थांनी माजी सरपंच गणेश आबा मोकाशे यांना त्यांच्या भावी सामाजिक, राजकीय व व्यावसायिक वाटचालीस आणि दीर्घायुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. दिलीप उढाणे सर यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे, शिक्षकांचे आणि सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली. या अनोख्या आणि समाजोपयोगी उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून आणि शिक्षण क्षेत्रातून मोठे कौतुक केले जात आहे.

### स्वतः आजारी असतानाही राहुल शिंदे यांनी अपघातग्रस्तास वेळेत रुग्णालयात दाखल केले

पाटोदा । प्रतिनिधी

धर्म, जात, पंथ आणि भेदभावाच्या पलीकडे जाऊन संकटात सापडलेल्या व्यक्तीला मदतीचा हात देणे हीच खरी माणुसकी असल्याचे प्रेरणादायी उदाहरण बीड जिल्ह्यात घडले आहे. पाटोदा येथील मरकस मस्जिदचे इमाम मौलाना अल्ताफ बद्रुद्दिन शेख यांचा रात्री भीषण अपघात झाल्यानंतर अनेक वाहने घटनास्थळावरून जात होती; मात्र मदतीसाठी कोणीही पुढे आले नाही. अशा वेळी स्वतः आजारी असून बीड येथे उपचार घेऊन परतत असलेले राहुल गोकुळ शिंदे यांनी क्षणाचाही विलंब न करता जखमी मौलानांना आपल्या वाहनातून रुग्णालयात दाखल करून माणुसकीचा जिवंत आदर्श समाजासमोर ठेवला.

मिळालेल्या माहितीनुसार, मौलाना अल्ताफ बद्रुद्दिन शेख हे बीडहून पाटोद्याकडे जात असताना रात्री साडेनऊच्या सुमारास वैद्यकीनी परिसरात त्यांच्या दुचाकीची रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला जोरदार धडक झाली. या अपघातात ते गंभीर जखमी होऊन रस्त्यावर पडले.

अपघातानंतर काही काळ घटनास्थळी नागरिकांची गर्दी झाली; मात्र प्रत्यक्ष मदतीसाठी कोणीही पुढे आले नाही. त्याचवेळी बीड येथे उपचार घेऊन परतणारे राहुल गोकुळ शिंदे तेथून जात होते. त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखत स्वतःच्या प्रकृतीची पर्वा न करता जखमी मौलानांना आपल्या वाहनातून तातडीने बीड येथील काकू-नाना हॉस्पिटलमध्ये दाखल केले. वेळेत उपचार सुरू झाल्याने त्यांना आवश्यक वैद्यकीय मदत मिळू शकली. राहुल शिंदे यांनी संकटात सापडलेल्या व्यक्तीचा धर्म, जात किंवा ओळख न पाहता केवळ माणुसकीच्या भावनेतून मदतीचा हात दिला. त्यांच्या या कृतीचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, सामाजिक सलोखा आणि मानवतेचा संदेश देणारे हे कृत्य असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. आजच्या सामाजिक वातावरणात धार्मिक आणि जातीय भेदांवर अनेकदा चर्चा होत असताना, राहुल गोकुळ शिंदे यांनी आपल्या कृतीतून धर्मापेक्षा माणुसकी मोठी हा संदेश कृतीतून अधोरेखित केला आहे. त्यांच्या या मानवतावादी कार्याबद्दल जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

'गोल्डन अवर'मध्ये मिळाली जीवनदायी मदत

रस्ते अपघातानंतरचा पहिला तास हा वैद्यकीय भाषेत 'गोल्डन अवर' मानला जातो. या कालावधीत जखमी व्यक्तीला तातडीने उपचार मिळाल्यास जीव वाचण्याची शक्यता लक्षणीयरीत्या वाढते. राहुल गोकुळ शिंदे यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे मौलाना अल्ताफ बद्रुद्दिन शेख यांना वेळेत उपचार मिळाले आणि मानवतेचा एक प्रेरणादायी आदर्श समाजासमोर उभा राहिला.

# डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी आएमए आक्रमक

## २० जुलैला महाराष्ट्रात २४ तासांसाठी आरोग्यसेवा ठप्प

**इमर्जन्सी आपत्कालीन सेवा मात्र सुरू राहणार राज्य पदाधिकारी डॉ.राजेश इंगोले यांची माहिती**

अंबाजोगाई । प्रतिनिधी

डोंबिवलीतील शास्त्रीनगर रूग्णालयात डॉक्टर आणि नर्सवर झालेल्या अमानुष हल्ल्याच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनने राज्यव्यापी आंदोलन पुकारले आहे. आयएमए महाराष्ट्र शाखेने येत्या सोमवार, दिनांक २० जुलै सकाळी ६ ते मंगळवार २१ जुलै सकाळी ६ पर्यंत २४ तास सर्व नियमित आरोग्यसेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

या काळात सर्व ओपीडी बाह्यरूग्ण विभाग, नियोजित शस्त्रक्रिया आणि रूटीन तपासणी बंद राहील. मात्र गंभीर रूग्णांच्या जीवाशी धोका होऊ नये म्हणून आय.सी.यु, आपत्कालीन विभाग, प्रसूती कक्ष आणि जीवनावश्यक उपचार सुरू ठेवण्यात येणार आहेत. या आंदोलनात अलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी, डेंटल, यूनाणीसह सर्व वैद्यकीय शाखांचे डॉक्टर, परिचारिका, पॅरामेडिकल स्टाफ आणि आरोग्य संघटना एकत्र येणार आहेत. महाराष्ट्र राज्य आयएमएने खालील प्रमुख मागण्या केलेल्या आहेत. त्या अशा : १) डोंबिवली हल्ल्यातील आरोपींना तात्काळ अटक आणि कठोर शिक्षा, २) डॉक्टर्स प्रोटेक्शन कायद्यात कडक तरतुदी आणि जलद अंमलबजावणी, ३) सर्व सरकारी आणि खाजगी रूग्णालयांमध्ये २५ ह्व७ सुरक्षा, सीसीटीव्ही प्रवेश नियंत्रण, ४) हल्ल्याच्या केसेससाठी फास्टट्रॅक कोर्ट, ५) आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र केंद्रीय कायदा आयएमए ने सरकारला इशारा दिला आहे की, ९ ऑगस्ट २०२६ पर्यंत ठोस निर्णय न झाल्यास राज्यभर बेमुदत संप आणि संपूर्ण वैद्यकीय सेवा बंद आंदोलन छेडण्यात येईल. जगातला कोणताही वैद्यकीय व्यावसायिक सर्वप्रथम रूग्णहिताला प्राधान्य देतो आपल्याकडे येणाऱ्या रूग्णाचे प्राण कसे वाचतील याकरिता तो आपले सर्व कौशल्य पणाला लावून त्या रुग्णाचा जीव वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतो. परंतु, ही सेवा देत असताना जर त्याच्या स्वतःच्याच जीविताला धोका असेल आणि अशा भयावह दडपणाच्या वातावरणात तो रुग्णाचा इलाज चांगल्या पद्धतीने करू शकेल का हा सवाल इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक विभागाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी सरकारला केला आहे. हा संपाचा निर्णय रूग्णांविरोधी नाही. डॉक्टर सुरक्षित राहतील तरच रुग्णसेवा सुरक्षित राहील असे डॉ.राजेश इंगोले यांनी स्पष्ट केले आहे.



डोंबिवलीतील डॉक्टरांवरील हल्ल्याचा निषेध करण्यासाठी आयएमए ने २० जुलै रोजी सकाळी ६ ते २१ जुलै सकाळी ६ पर्यंत महाराष्ट्रातील सर्व नियमित आरोग्यसेवा बंद ठेवण्याची घोषणा केली आहे. फक्त इमर्जन्सी, अतिदक्षता विभाग आणि प्रसूती सेवा सुरू राहणार असल्याची माहिती इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या अधिनिस्त सर्व शाखांना दिली आहे. या संपामुळे रूग्णांना होणाऱ्या त्रासाबद्दल इंडियन मेडिकल असोसिएशन दिलगीर आहे. परंतु, डॉक्टरांना काम करण्यासाठी मुक्त वातावरण मिळत नसल्याने तसेच छोट्या-मोठ्या गोष्टींवरून डॉक्टरांना, नर्सेसला, पॅरामेडिकल स्टाफला मारहाण होणे चुकीचे व गंभीर आहे त्यामुळे नाईलाजाने हा संप आम्हाला करावा लागत आहे असेही डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. या लाक्षणिक एक दिवसीय संपानंतरही जर सरकारने ९ ऑगस्टपर्यंत सकारात्मक निर्णय न घेतल्यास संपूर्ण महाराष्ट्रात बेमुदत संप पुकारला जाईल आणी सर्व खासगी तसेच सरकारी वैद्यकीय सेवा संप काळात बंद केल्या जातील त्यानंतर सर्व जबाबदारी सरकारवर राहील असा गंभीर इशारा इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या तर्फे देण्यात आला आहे असे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी प्रसिद्धी माध्यमांना सांगितले.

## पाटोदा नगरीत राष्ट्रसंत भगवान बाबांच्या पालखीचे जंगी स्वागत; २५१ किलोच्या पुष्पहाराने वेधले सर्वांचे लक्ष

पाटोदा । प्रतिनिधी

वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या पालखी सोहळ्याचे आज पाटोदा नगरीत अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले. पाटोदा नगरपंचायत आणि समस्त ग्रामस्थांच्या वतीने आयोजित या स्वागत सोहळ्याने संपूर्ण नगरी 'विठ्ठलनामाच्या' गजराने दुमदुमून गेली होती.

आ. सुरेश (आण्णा) धस यांच्या हस्ते पूजन

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे, लोकप्रिय आमदार सुरेश (आण्णा) धस यांच्या हस्ते पालखीतील पादुकांचे पूजन करण्यात आले. यावेळी आ. धस यांनी भगवान बाबांच्या पादुकांचे दर्शन घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. आ. धस यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली नगरपंचायत व गावकरी यांच्या वतीने पालखीचे जंगी स्वागत करण्यात आले.

२५१ किलो पुष्पहाराचा भव्य सन्मान

या स्वागत सोहळ्यातील सर्वात लक्षवेधी बाब म्हणजे, पाटोदा नगरपंचायतीच्या वतीने क्रेनच्या साहाय्याने राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या



पालखीवर तब्बल २५१ किलो वजनाचा भव्य पुष्पहार अर्पण करण्यात आला. हा क्षण उपस्थित हजारो भाविकांसाठी अत्यंत अविस्मरणीय आणि डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरला.

भक्तीमय वातावरणात दुमदुमली नगरी

टाळ-मृदंग, वीणेकरी, हलगी पथक आणि संबळ पथकाच्या निनादाने संपूर्ण परिसर भारून गेला होता. ज्ञानोबा-तुकाराम, जय हरी विठ्ठल आणि भगवान बाबा की जय अशा जयघोषाने पाटोदा नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली. हजारो वारकऱ्यांनी आणि भाविकांनी बाबांच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

दिग्गज मान्यवरांची उपस्थिती

या ऐतिहासिक सोहळ्याप्रसंगी ह.भ.प. सतीश (बाबा) महाराज उरणकर, ह.भ.प. वैराग्यमूर्ती रामकृष्ण रंधवे (बापू), नगराध्यक्षा राधाताई (आईसाहेब) सानप यांच्यासह नगरपंचायतीचे उपनराध्यक्ष, गटनेते, विविध सभापती, नगरसेवक-नगरसेविका, मुख्याधिकारी, तहसीलदार, आरोग्य विभागाचे अधिकारी, अभियंते आणि विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. वारकरी परंपरेचा हा दिव्य सोहळा पाटोदा नगरीच्या इतिहासात एक सुवर्णपान म्हणून कायम स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

पान ६ वरुन...

### वैद्यनाथ विद्यालयातील

उडवाउडवीची व असंवेदनशील भूमिका घेतल्याचा आरोप बागवाले यांनी केला आहे. बागवाले यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्याऐवजी शिक्षणाधिकाऱ्यांनी, दोन महिन्यांनी विद्यार्थ्यांना जाग आली का?, विद्यार्थ्यांना शिक्षकांकडूनच उपोषणासाठी उकसवले जात आहे अशी वक्तव्ये केली. तसेच, विद्यार्थी उपोषणाला बसत नसतात, हे सगळे नाटक आहे, असे म्हणत आंदोलनाची थट्टा उडवली. आंदोलनकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्याचीही भाषा वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे. या भूमिकेमुळे पालक, विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

### ग्रामीण भागातही

व्याजदर लावून मोठ्या प्रमाणावर कर्ज वसुलीसाठी शारीरिक आणि मानसिक छळ सुरू केल्याची गंभीर तक्रार करण्यात आली.

सहाय्यक निबंधक यांचे कारवाईचे आश्वासन

पतसंस्थेच्या विरोधात उपोषण सुरू केल्यानंतर दिनांक १५ रोजी सहाय्यक निबंधक गेवराई यांच्या कार्यालयाने याप्रकरणी दखल घेतली. प्रशासनामार्फत कारवाई सुरू आहे. सदर  असल्याने उपोषण मागे घेण्यासंदर्भात पत्र देण्यात आल्याने उपोषण मागे घेण्यात आले. दरम्यान चकलांबा येथील 'या पतसंस्थेने' नियमबाह्य अनेक प्रकरणे केल्या असल्याचे तक्रारी करण्यात आल्या आहेत.

पतसंस्थेकडून लुटमार

बीड जिल्ह्यात अनेक पतसंस्थेचे कारभार मागील दोन-तीन वर्षापासून घ्यायला आल्याने हजारो ठेवीदारांच्या ठेवी बुडाल्या आहेत. अनेक गैरव्यवहार चव्हाट्यावर आले आहेत. असे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. जिल्ह्यातील अशा छोट्या पतसंस्थेवर अंकुश ठेवण्यास सहकार खाते अपयशी झाले आहे. यासंदर्भात भविष्यात जिल्हा सहनिबंधक, सहाय्यक निबंधक, सहकार खाते यांनी दखल घेण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली.

### ग्रामीण भागातील फेटा

बाजारात 'रेडीमेड फेटे' आणि 'पुणेरी पगडी' यांचा वापर वाढला आहे.महाराष्ट्रात प्रामुख्याने पुणेरी फेटा,कोल्हापुरी फेटा,आणि शाही फेटा अशा विविध प्रकारांनी फेटा बांधला जातो. फेटा बांधण्यासाठी साधारणपणे ३.५ ते ५ मीटर लांब आणि १ मीटर रुंद सुती किंवा रेशमी कापड (मलमल किंवा पैठणी सिल्क) वापरले जाते.फेट्याच्या समोरील बाजूस मध्यभागी कलंगी किंवा मोरपीस लावून फेट्याला आकर्षक रूप दिले जाते. डोक्यावर फेटा घट्ट बसावा आणि तो सैल होऊ नये म्हणून कापडाच्या घड्या घालून 'पाग' तयार केली जाते.कापडाला पीळ देऊन एकावर एक अशा गोलाकार वळ्या डोक्याभोवती आवळून बांधल्या जातात. मागच्या बाजूस फेट्याचा पदर (शेपूट) मोकळा सोडला जातो,जो फेट्याची खरी शोभा वाढवतो.

फेट्याचे विविध प्रकार असुन यामध्ये कोल्हापुरी फेटा हा अधिक घट्ट आणि गोल बांधणीचा असतो. लाल,भगवा किंवा केशरी रंगात हा जास्त बांधलाय जातो.तसेच पुणेरी फेटा हा आकाराने थोडा मोठा, रुबाबदार आणि मुख्यत्वे भगव्या रंगाचा व जरीच्या पदराचा असतो.ग्रामीण भागातील 'पटका' किंवा 'फेटा' घालणारी ही शेवटची पिढी म्हणजे आपल्या संस्कृतीचा चालता-बोलता इतिहास आहे. उन्हा-तान्हात शेतात राबताना डोक्याचे रक्षण करण्यासाठी, मान-सन्मानाचे प्रतीक म्हणून आणि अस्मितेचा भाग म्हणून ही पिढी अभिमानाने पटका घालत असे.

### वडवणी मध्ये निष्ठेचा

याच कार्यकर्त्यांपैकी एक असलेल्या, ऊस तोड कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष पिंटू भाऊ डोंगरे यांनी आपल्या नेत्यावर असलेले प्रेम एका अनोख्या पद्धतीने व्यक्त केले. त्यांनी कोणत्याही राजकीय फायद्या-तोट्याचा विचार न करता, थेट आपल्या हातावर बाबरी मुंडे यांचे चित्र (टॅटू) कोरून घेतले आहे. या टॅटूची सध्या संपूर्ण बीड जिल्ह्यात आणि सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू आहे.नेते कोणत्याही पक्षात असोत, आमचे त्यांच्यावरचे प्रेम आणि निष्ठा कधीच बदलू शकत नाही, अशी भावना हा टॅटू काढल्यानंतर पिंटू भाऊ डोंगरे यांनी व्यक्त केली. राजकीय पटलावर नेत्यांचे गट आणि तट बदलत असताना, कार्यकर्त्यांचे हे असं अजब प्रेम बीडच्या राजकीय संस्कृतीची एक वेगळीच आणि भावनिक बाजू समोर आणणारे ठरले आहे. सध्या वडवणीत या टॅटूची आणि मुंडे यांच्या संभाव्य राजकीय भूमिकेचीच सर्वाधिक चर्चा रंगत आहे.

### बेलेश्वर संस्थानच्या श्रीगुरू ईश्वरबाबा

भालचंद्र गणपती मंदिरात मुक्काम;

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरकडे निघालेल्या वारकऱ्यांसाठी लिंबागणेश ग्रामस्थांच्या वतीने श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिरात मुक्काम व महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली. यावेळी ह.भ.प. माऊली महाराज शेळके (वरंगळवाडी, ता. शिरूर कासार) यांच्या सुश्राव्य कीर्तनाने भाविक मंत्रमुग्ध झाले.यापूर्वी गावाच्या वेशीवर महंतांचे पुष्पहारांनी स्वागत करण्यात आले. रांगोळ्या, पायघड्या, सुवासिनींचे औक्षण आणि सवाद्य मिरवणुकीतून दिंडीचे मंदिरापर्यंत स्वागत करण्यात आले. यावेळी सरपंच बाळासाहेब जाधव, बाळकृष्ण थोरात, कल्याण वाणी, पांडुरंग वाणी, अनंतकाका मुळे, बाळकृष्ण मुळे,गणपत तागड, दादा गायकवाड, सुरेश ढवळे,बाजीराव दशमे, विक्रम दाभाडे, शिवहरी कोटुळे, संतोष भोसले, अभिजित गायकवाड, भगवान मोरे, , अर्जुन घोलप, रामदास मुळे, हरिओम क्षीरसागर, डॉ. गणेश ढवळे यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक, वारकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नीटमध्ये देशात १७२ वी रँक मिळवत वडवणीच्या कृष्णा जाधवचा सुवर्ण पराक्रम!

### ६८६ गुणांची नेत्रदिपक दमदार कामगिरी;राजर्षी शाहू विद्यालयाकडून कृष्णाचा गौरव

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील साळींबा या छोट्याशा गावचा रहिवासी व वडवणी येथील छत्रपती राजर्षी शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी चि.कृष्णा भागवत जाधव याने वैद्यकीय राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परिक्षा नीट-२०२६ मध्ये ६८६ गुण मिळवत देशातून १७२ वी रँक पटकावून अभूतपूर्व यश संपादन केले आहे. व आपल्या आई-वडिलांचे, गावाचे व विद्यालयाचे नाव रोशन केले आहे. आपल्या जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रमाच्या जोरावर मिळवलेल्या या यशामुळे विद्यालयासह वडवणी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात याने मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या दैदिप्यमान यशाबध्दल विद्यालयाच्या वतीने काल दि.१७ शुक्रवार रोजी कृष्णा जाधव याचा तसेच पालक भागवतराव जाधव शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा.सर्जेराव काळे सर होते. तर कार्यक्रमास विद्यालयाचे प्राचार्य सानप सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच विठ्ठल सवासे, प्रा. वांगी सर, माजी सरपंच रामेश्वर भाऊ जाधव, विश्वनाथ शिंदे, प्रा.ओमप्रकाश जाधव सर यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष प्रा.सर्जेराव काळे सर म्हणाले की, कृष्णा जाधवने मिळवलेले यश हे केवळ त्याच्या कुटुंबासाठी किंवा विद्यालयासाठीच नव्हे, तर



संपूर्ण वडवणी तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे. सातत्यपूर्ण परिश्रम, शिस्त, जिद्द आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा यामुळेच हे दैदिप्यमान यश त्याने संपादन केले आहे. आजच्या विद्यार्थ्यांनी कृष्णाच्या यशातून प्रेरणा घेवून मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम घ्यावेत. कृष्णा हा केवळ डॉक्टर बनून तिथपर्यंतच सीमित राहणारा विद्यार्थी नाही. त्याच्यात नेतृत्वगुण, अभ्यासू वृत्ती, व्यापक दृष्टीकोन आणि समाजासाठी काहीतरी मोठे करण्याची जिद्द आहे. त्यामुळे भविष्यात तो वैद्यकीय क्षेत्रात यश मिळवतानाच देशाच्या सर्वोच्च प्रशासकीय सेवेत प्रवेश करुन एक सक्षम, कर्तव्यदक्ष आणि लोकाभिमुख आयएएस किंवा सुपर क्लास वन अधिकारी म्हणून देशाची सेवा करतांना आपण निश्चितपणे पाहू, असा मला ठाम विश्वास आहे. ज्ञान, सेवा आणि संवेदनशीलता या त्रिसूत्रीच्या बळावर कृष्णाने समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांसाठी कार्य करावे, आपल्या विद्यालयाचे, आई-वडिलांचे आणि संपूर्ण महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करावे, अशा मनःपूर्वक शुभेच्छा देत त्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मी सदिच्छा व्यक्त करतो असेही काळे सर म्हणाले. या सत्काराला उत्तर देतांना कृष्णा जाधव म्हणाला की, यश हे नशिबावर नव्हे तर कष्टावर अवलंबून असते. नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा विश्वास यामुळेच मला हे यश मिळाले. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःवर विश्वास ठेवून प्रामाणिक प्रयत्न केले, तर यश निश्चित मिळते असेही शेवटी कृष्णा जाधव म्हणाले. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी कृष्णा जाधव याच्या उज्ज्वल भवितव्यास शुभेच्छा देत त्याच्या यशाचा गौरव केला. विद्यालयातील विद्यार्थ्यांनीही त्याच्याकडून प्रेरणा घेवून स्पर्धा परिक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करावे, असे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.जाधव सर यांनी केले तर सुत्रसंचालन महानवर सर यांनी केले. शेवटी उपस्थितांचे आभार इतापुरे सर यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले. दरम्यान नीट परीक्षेतील या उल्लेखनीय यशामुळे कृष्णा जाधव यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या यशाने संपूर्ण वडवणी तालुक्याला अभिमानास्पद क्षण अनुभवायला मिळाला आहे.

### सामाजिक बांधिलकी ठेवून नियमित रक्तदान केले पाहिजे - जिल्हा न्यायाधीश डॉ. उमेशचंद्र मोरे

माजलगाव । प्रतिनिधी

जागतिक न्याय दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देत, जागतिक न्याय दिनाच्या पार्श्वभूमीवर दि. १७ जुलै शुक्रवारी रोजी माजलगाव जिल्हा व सत्र न्यायालयाच्या परिसरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण/विधी सेवा समिती, वकील संघ माजलगाव आणि आरोग्य विभाग, जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमास न्यायालयीन अधिकारी, वकील,कर्मचारी तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा न्यायाधीश डॉ. उमेशचंद्र मोरे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा न्यायाधीश राजश्री परदेशी, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) गणेश खूपसे, वकील संघाचे अध्यक्ष भाई ड. नारायण गोले पाटील तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मधुकर घुबडे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक वकील संघाचे अध्यक्ष भाई ड. नारायण गोले पाटील यांनी



केले. यावेळी डॉ. मधुकर घुबडे यांनी शासनाच्या विविध आरोग्य योजनांची सविस्तर माहिती देत नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा,असे आवाहन केले.अध्यक्षीय समारोपात जिल्हा न्यायाधीश डॉ. उमेशचंद्र मोरे यांनी रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून प्रत्येकाने सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून नियमित रक्तदान करावे, असे प्रतिपादन केले.या शिबिरात २४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच १५२ नागरिकांनी विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला, तर ५२ जणांची ईसीजी तपासणी करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वकील संघाचे उपाध्यक्ष ड राहुल बजाज यांनी केले, तर आभार प्रदर्शन वकील संघाचे सचिव ड नारायण तेलगड यांनी केले.या प्रसंगी वकील संघाच्या ग्रंथपाल ड.सीमा उजगरे, न्यायालयातील अधीक्षक श्री. देशमुख, श्री. पाठक यांच्यासह शेकडो वकील बांधव, न्यायालयीन अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.जागतिक न्याय दिनाच्या निमित्ताने विधी सेवा समिती, वकील संघ माजलगाव आणि आरोग्य विभाग, जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक उत्तरदायित्व, रक्तदान जनजागृती आणि आरोग्य संवर्धनाचा प्रेरणादायी आदर्श ठरला.

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

**दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६** Email id-tahshildarambad@gmail.com

**जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-५२८** **दिनांक ०९/०७/२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **तनवीर शब्बीर शेख रा.डावरगाव ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या मुलाचा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | तनवीर शब्बीर शेख | स्वत:चे | १९/०१/१९९८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०९/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

**दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६** Email id-tahshildarambad@gmail.com

**जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-५२७** **दिनांक ०९/०७/२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **शेख शब्बीर शेख बशीर रा.डावरगाव ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या मुलाचा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | फैजान शब्बीर शेख | मुलगा | २३/०७/२००२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०९/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

# जाचक अटींमुळे शेतकऱ्यांना सलोखा योजनेचा लाभ मिळेना

पुणे / प्रतिनिधी

शेतजमिनींच्या ताबा आणि मालकीवरील वाद सामोपचाराने मिटविण्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेली सलोखा योजना प्रत्यक्षात जाचक अटींमुळे प्रभावी ठरत नसल्याचे चित्र आहे. सलग १२ वर्षांच्या ताब्याचा महसुली पुरावा आणि तुकडेबंदी कायद्याच्या अटींमुळे अनेक शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहत आहेत.

शेतजमिनींच्या ताबा आणि वहिवाटीवरून निर्माण होणारे वाद सामोपचाराने मिटवून न्यायालयीन खटले, कौटुंबिक तणाव आणि आर्थिक खर्च कमी करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने सुरू केलेली सलोखा योजना प्रत्यक्षात मात्र जाचक अटी आणि तांत्रिक अडथळ्यांमुळे प्रभावीपणे राबविली जात नसल्याचे चित्र आहे. शासनाने योजनेच्या अंमलबजावणीस १ जानेवारी २०२७ पर्यंत मुदतवाढ दिली असली, तरी आवश्यक अटी पूर्ण करणे कठीण जात असल्याने अनेक शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहत आहेत. योजनेचा उद्देश निश्चितच चांगला आहे. मात्र, १२ वर्षांच्या ताब्याचा पुरावा, तुकडेबंदी कायद्याच्या अटी आणि इतर तांत्रिक अडचणींमुळे शेतकरी प्रस्ताव दाखल




करण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे योजनेला अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. तज्ज्ञांच्या मते, सलोखा योजनेमुळे शेतजमिनीवरील दीर्घकालीन वाद, न्यायालयीन खर्च आणि कौटुंबिक तणाव कमी करण्याची मोठी संधी उपलब्ध आहे. मात्र, त्यासाठी काही महत्त्वाच्या सुधारणा आवश्यक आहेत. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, शासनाने प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन नियमांमध्ये आवश्यक बदल केल्यास हजारो प्रलंबित जमीन वाद सामोपचाराने निकाली निघू शकतात. त्यामुळे न्यायालयांवरील ताण कमी होण्यासोबतच ग्रामीण भागातील सामाजिक सलोखाही अधिक मजबूत होईल. सध्या मात्र जाचक अटी आणि तांत्रिक प्रक्रियेमुळे राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी सलोखा योजना कागदावरच मर्यादित राहिल्याचे चित्र दिसून येत आहे. १२ वर्षांच्या ताब्याची अट शिथिल करणे. तुकडेबंदी कायद्यात आवश्यक सवलती देणे. कर्जदार जमिनींच्या व्यवहारांबाबत स्पष्ट धोरण जाहीर करणे. दुय्यम निबंधक कार्यालयांना स्पष्ट मार्गदर्शक सूचना देणे, या उपाययोजना कराव्या लागणार आहेत.

योजनेचा उद्देश :सलोखा योजनेअंतर्गत प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या शेतजमिनींची परस्पर अदलाबदल करून मालकी हक्क नियमित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेले जमिनीचे वाद न्यायालयात न जाता सामोपचाराने मिटू शकतात. ग्रामीण भागातील कौटुंबिक आणि शेजारील वाद सोडविण्यासाठी ही योजना महत्त्वाची मानली जाते.

१२ वर्षांच्या ताब्याची अट अडथळा :या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित जमिनीवर सलग १२ वर्षे ताबा असल्याचा महसुली पुरावा सादर करणे बंधनकारक आहे. हीच अट अनेक शेतकऱ्यांसाठी सर्वात मोठा अडथळा ठरत आहे. ग्रामीण भागात अनेक जमिनींचे व्यवहार वर्षानुवर्षे तोंडी करारावर किंवा परस्पर समजुतीने सुरू असल्याने त्याबाबत आवश्यक महसुली कागदपत्रे उपलब्ध नसतात. परिणामी पात्र असूनही अनेक शेतकरी अर्ज दाखल करू शकत नाहीत. तुकडेबंदी कायद्याचाही अडसर : १२ वर्षांच्या अटीबरोबरच तुकडेबंदी कायद्याच्या तरतुदी देखील अनेक प्रस्तावांना अडवित आहेत. जमिनीची अदलाबदल करताना तुकडेबंदीच्या नियमांचे पालन करावे लागत असल्याने अनेक प्रस्ताव नोंदणीच्या टप्प्यावरच रखडत आहेत. शासनाने या नियमांमध्ये काही प्रमाणात सवलत देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याचे सांगितले असले, तरी त्यासंदर्भातील स्पष्ट आदेश अद्याप दुय्यम निबंधक कार्यालयांना प्राप्त झाले नसल्याची माहिती समोर आली आहे.

अत्यल्प प्रतिसाद :

सलोखा योजनेबाबत जनजागृती असूनही प्रत्यक्षात या योजनेला अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. वाशिम जिल्ह्यात महिन्याला केवळ एक ते दोन प्रकरणेच नोंदविली जात असल्याचे चित्र आहे.

## गुलाबी बोंडअळीला घालविण्यासाठी फवारणी ऐवजी करा हे उपाय



गेल्या काही वर्षापासून कपाशीवर गुलाबी बोंडआळीचा प्रादुर्भाव खूप मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे उत्पादनात प्रचंड प्रमाणात घट येत असून, शेतकऱ्यांना खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसत आहे. कारण गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव झाल्यानंतर कितीही प्रमाणात उपाययोजना केल्या तरी सर्व निरर्थक ठरतात. कारण या अळ्या कपाशीच्या बोंडामध्ये राहतात व आतून त्या बोंडाचा गर खातात यामुळे कापसाची प्रत खालावते. कपाशीच्या दृष्टिकोनातून विचार केला तर गुलाबी बोंडअळी ही सर्वात घातक कीटक समजली जाते. म्हणून नुकसान टाळायचे असेल तर फवारणी शिवाय काही एकात्मिक व्यवस्थापनाच्या पद्धती अवलंबल्या तर नक्कीच फायदा मिळू शकतो.

कामगंध सापळ्यांचा वापर : बोंड आळीचे पतंग कपाशीमध्ये फिरताना दिसतात. कारण या कालावधीमध्ये बऱ्याच ठिकाणी कापसाला पाते व फुले तसेच बोंडे लागत असल्यामुळे यामध्ये या अळीचे मादी पतंग अंडी घालतात व त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. यावर नियंत्रण म्हणून कपाशीचे व्यवस्थित निरीक्षण करून गुलाबी बोंड अळी असलेल्या डोमकळ्या तोडणे व त्या जाळून किंवा जमीनीत पूर्ण नष्ट करणे हा एक चांगला उपाय आहे. तसेच एका हेक्टरमध्ये पाच कामगंध सापळे पिकाच्या उंची पेक्षा एक ते दीड फूट उंचीवर लावणे महत्त्वाचे ठरते. पतंगाचे प्रमाण जास्त असेल तर एक हेक्टरमध्ये आठ ते दहा कामगंध सापळे लावावेत.

जैविक नियंत्रण : जैविक कीड नियंत्रण पद्धतीमध्ये जर ट्रायकोग्रामा बॅक्ट्री हे परोपजीवी कीटक बोंड अळ्या खातात. त्यामुळे हे कीटक देखील खूप महत्त्वाचे ठरतात. तसेच दुसरे महत्त्वाचे म्हणजे जर एका एकर मध्ये दोन किंवा तीन ट्रायको कार्ड लावले तरी फायदा मिळतो. परंतु कपाशी पिक साठ दिवसाचे झाल्यावर ट्रायकोकार्ड लावणे गरजेचे आहे. परंतु शेतामध्ये जर ट्रायकोकार्ड लावले तर दहा दिवस कुठल्याही प्रकारची फवारणी करू नये. हे कार्ड तुम्हाला तुमच्या विभागाच्या कृषी विद्यापीठात मिळू शकते. शेतात पक्षीथांबे उभारा : बोंड आळीला रोखण्याचा एक सर्वात महत्त्वाचा आणि सोपा उपाय म्हणजे पक्षी थांबे लावणे हे होय. म्हणजे यावर पक्षी बसतात व शेतामधील अळ्या खातात.

## चांगल्या उत्पादनासाठी खरीप ज्वारी लागवडीचे नियोजन

यंदाच्या कमी पावसाच्या दृष्टीने ज्वारीची लागवड करण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. परंतु कमी पावसाच्या दृष्टीने योग्य लागवड, पेरणी, खत आणि आंतरमशागत करणेही तितकेच आवश्यक आहे. कारण चुकीच्या लागवड नियोजनामुळे उत्पादनात मोठी घट पाहायला मिळते. त्यामुळे ज्वारी संशोधन केंद्र आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठाने ज्वारीच्या लागवड तंत्राची शिफारस केली आहे.

पूर्वमशागत : ज्वारीच्या लागवडीसाठी अगोदरच्या पिकानंतर कुळवाची किंवा वखराची खोल पाळी द्यावी. त्यानंतर २ ते ३ वेळा वखराच्या पाळ्या द्याव्यात. शेवटच्या पाळीपूर्वी ५ ते ६ टन प्रती हेक्टरी शेणखत जमिनीत मिसळावे. पेरणी : ज्वारीची पेरणी मॉन्सूनचा चांगला पाऊस झाल्यावर मातीला वाफसा आल्यावर करावी. लवकर पेरणी केल्यास खोडमाशीचा प्रादुर्भाव कमी होतो. ज्वारीची पेरणी तिफणीने किंवा दोन चाड्याच्या पाभरीने करावी. ज्वारीच्या दाण्यांचा आकार लहान असल्याने त्याची पेरणी २ ते ३ सेंमी खोलीवर करावी. दोन ओळीतील अंतर ४५ सेंमी आणि दोन रोपातील अंतर १५ सेंमी इतके ठेवावे. एक हेक्टर क्षेत्रासाठी ७ ते १० किलो बियाणे लागते.

खत व्यवस्थापन : ज्वारी हे तृणधान्य पीक असल्याने ते अन्नद्रव्यांच्या बाबतीत ते खादाड असते. ज्वारीला हेक्टरी ८०:४०:४० चा नत्र, स्फुरद, पालाशचा डोस द्यावा. यामध्ये ४० किलो नत्र, ४० किलो स्फुरद आणि ४० पालाश लागवडीवेळी द्यावे. आणि पेरणीनंतर ३० दिवसांनी नत्राची उरलेली मात्रा द्यावी. या मात्रेसाठी सरळ खतांचा वापर केल्यास ८७ किलो युरिया, २५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट, आणि ८० किलो म्युरेट ऑफ पोटॅश द्यावे आणि ३० दिवसांनी पुन्हा ८७ किलो युरिया प्रति हेक्टर द्यावा. जर तुम्हाला रासायनिक खतांमध्ये मिश्र खतांचा वापर करायचा असेल तर २०:२०:० हे मिश्र खत २०० किलो आणि म्युरेट ऑफ पोटॅश हे खत ६७ किलो पेरणीच्या वेळी देऊ शकतात.

पाणी व्यवस्थापन : ज्वारीच्या पिकाला त्याच्या संवेदनशील काळात पाणी देणे अत्यंत आवश्यक असते. जसे पिकाचा वाढीचा काळ, पीक पोटरीत येण्याचा काळ, फुलोऱ्यात येण्याचा काळ आणि दाणे भरण्याची अवस्था या चार अवस्थेत पाणी देणे गरजेचे असते.

आंतरमशागत : ज्वारी पिकासाठी पेरणीनंतर ३,५ व ८ व्या आठवड्यानंतर कोळपणी करावी. तर पहिली विरळणी पेरणीनंतर १० ते १२ दिवसांनी आणि दुसरी विरळणी पेरणीनंतर २० ते २२ दिवसांनी करावी. तण नियंत्रणासाठी खुरपणी आणि कोळपणी पीक पेरणीनंतर ४० ते ४५ दिवसांपूर्वीच करावी.

आंतरपीक : यंदा कमी पाण्याच्या दृष्टीने आंतरपीक फायदेशीर ठरु शकतात. त्यामुळे ज्वारीसोबत तूर हे आंतरपीक घ्यावे. यात (२:१) म्हणजेच दोन ओळी ज्वारीच्या आणि १ ओळ तुरीची लावावी. किंवा २ ओळी तुरीच्या आणि १ ओळ ज्वारीची लावावी.



## दिन विशेष




### महत्वाच्या घटना

१६९२ : अमेरिकेतील सेलम शहरात चेटकीण असल्याच्या आरोपाखाली स्त्रियांना फाशी देण्यात आली.
१८३२ : सर चार्ल्स हेस्टिंग्स यांनी ब्रिटिश मेडिकल असोसिएशन आणि सर्जिकल असोसिएशनची स्थापना केली.
१९०० : पॅरिस मेट्रोची पहिली सेवा सुरु झाली
१९०३ : मॉरिस गरीन यांनी पहिली टूर डी फ्रान्स स्पर्धा जिंकली.
१९०५ : लॉर्ड कर्झन यांनी बंगालच्या फाळणीची घोषणा केली.
१९३५ : जगात 'पार्किंग मीटर'चा वापर प्रथमच अमेरिकेतील ओक्लाहोमा शहरातील वाहनतळावर सुरू झाला.
१९४० : दुसरे महायुद्ध केप स्पादाची लढाई
१९४७ : म्यानमारच्या सरकारचे नियोजित पंतप्रधान आंग सान व त्यांच्या ६ मंत्री आणि २ सहकार्यांची गॅलॉन सॉ याने हत्या केली.
१९५२ : फिनलंडमधील हेलसिंकी येथे १५ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९६९ : भारतातील १४ मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.
१९६९ : नील आर्मस्ट्रॉंग, एडवीन ऑल्ड्रिन व मायकेल कॉलिन्स या अंतराळवीरांसह अपोलो ११ हे अंतराळयान चंद्राच्या कक्षेत पोहोचले.
१९७६ : नेपाळमधे सागरमाथा राष्ट्रीय उद्यानाची रचना करण्यात आली.
१९८० : सोविएत युनियनमधील मॉस्को येथे २२ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९९२ : ऊर्दू कवी मजरुह सुलतानपुरी यांना मध्यप्रदेश सरकारतर्फे इक्बाल सन्मान पुरस्कार जाहीर
१९९३ : ग्रामीण भागातील महिलांचे जीवनमान सुधारण्यासाठी केलेल्या कार्याबद्दल डॉ. बानू कोयाजी यांना समाजसेवेसाठीचा 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' जाहीर
१९९६ : अमेरिकेतील अटलांटा येथे २६ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
२००५ : भारताचे तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंह यांनी अमेरिकेच्या कॉंग्रेसला संबोधित केलं.
२००८ : प्रशांत महासागरात आपल लक्ष्य निर्धारित करून अमेरिकेने लांब पल्ल्या मारण्यास सक्षम असलेल्या एका क्षेपणास्त्राची चाचणी केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१४ : अमेरिकन संशोधक सॅम्युअल कॉल्ट यांचा जन्म.
१८२७ : मंगल पांडे क्रांतिकारक (मृत्यू: ८ एप्रिल १८५७)
१८३४ : फ्रेंच चित्रकार एदगार देगास यांचा जन्म.
१८९६ : ए. जे. क्रोनिन स्कॉटिश लेखक (मृत्यू: ६ जानेवारी १९८१)
१८९९ : भारतीय डॉक्टर, लेखक, कवी आणि नाटककार बालाइ चांद मुखोपाध्याय यांचा जन्म. (मृत्यू: ९ फेब्रुवारी १९८९)
१९०२ : यशवंत नरसिंह केळकर कवी, कोशकार, इतिहास संशोधक, इतिहास लेखक, शाहिरी वाङ्मयाचे संग्राहक, संपादक व प्रकाशक (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९९४)
१९०२ : भारतीय गायक, निर्माता, निर्माता आणि पटकथालेखक समृतरा राघवाचार्य यांचा जन्म. (मृत्यू: १६ मार्च १९६८)
१९०९ : भारतीय कवी आणि लेखक बाल्मनी अम्मा यांचा जन्म. (मृत्यू: २९ सप्टेंबर २००४)
१९२७ : थोर भारतीय स्वातंत्र्य सैनिक मंगल पांडे यांचा जन्मदिन.
१९३८ : सुप्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ आणि गणितज्ञ डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांचा कोल्हापूर येथे जन्म.
१९४६ : इलि नास्तासे रोमानियन टेनिसपटू १९६४ मधे केम्ब्रिज विद्यापीठात डॉ. फ्रेड हॉईल यांच्याबरोबर संशोधन करुन गुरुत्वाकर्षणासंदर्भातील एक नवा सिद्धांत मांडला.
१९५५ : रॉजर बिन्नी क्रिकेटपटू
१९६१ : भारतीय पत्रकार आणि लेखक हर्षा भोगले यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

९३१ : उडा जपानचा सम्राट (जन्म: ५ मे ८६७)
१३०९ : संत विसोबा खेचर (संत नामदेव यांचे गुरू) समाधिस्थ झाले (जन्म:)
१८८२ : फ्रान्सिस बाल्फोर प्राण्यांच्या वर्गीकरणाविषयी मूलभूत संशोधन करणारे ब्रिटीश निसर्ग शास्त्रज्ञ (जन्म: १० नोव्हेंबर १८५१)
१९६५ : सिंगमन र्‍ही दक्षिण कोरियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: २६ मार्च १८७५)
१९६८ : प्रतापसिंग गायकवाड बडोद्याचे महाराज (जन्म: २९ जून १९०८)
१९८० : तुर्कस्तानचे पंतप्रधान निहात एरिम यांचे निधन.
२००४ : जपानचे पंतप्रधान झेन्को सुझुकी यांचे निधन.


## करटुलीची वाढती मागणी; जाणून घ्या लागवडीपासून उत्पादनापर्यंतची संपूर्ण माहिती

करटुले हे कुकुर्बिटेसी कुळातील बहुवर्षायू वेलवर्गीय भाजीपाला पीक असून, त्याला औषधी व पोषणमूल्याच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. महाराष्ट्रात करटुले, कांकडा, मठा कारले, काकरोळ, कंतोळ, भटकरेले अशा विविध नावांनी ही भाजी ओळखली जाते. कारल्याच्या कुळातील असली तरी कडूपणा नसल्याने तिची चव अधिक रुचकर असते. सध्या महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल आणि कर्नाटकमध्ये या पिकाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. छत्तीसगड, झारखंड आणि ओडिशाच्या जंगल भागात ही भाजी नैसर्गिकरित्या उगवते. पोषक गुणधर्म, औषधी उपयोग, चांगला बाजारभाव आणि दीर्घ साठवणक्षमता यामुळे करटोली हे भविष्यात शेतकऱ्यांसाठी अधिक नफा देणारे पीक ठरू शकते.

करटोलीची वैशिष्ट्ये : करटोलीची फळे लहान, टोकदार व मऊ काट्यांनी झाकलेली असतात. कच्ची फळे हिरव्या रंगाची असून पिकल्यानंतर पिवळसर-नारिंगी होतात. या फळांमध्ये प्रथिने, कॅल्शियम, फॉस्फरस, लोह, बीटा-कॅरोटीन, जीवनसत्त्व सी, फॉलिक ॲसिड आणि इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये मुबलक प्रमाणात आढळतात.

पौष्टिक आणि औषधी गुणधर्म : करटोलीमध्ये ८४ ते ८७ टक्के पाणी असते. त्यामुळे ती पचायला हलकी आणि आरोग्यासाठी उपयुक्त मानली जाते.

औषधी उपयोग : मधुमेह नियंत्रणासाठी उपयुक्त, रक्तदाब नियंत्रणास मदत, पानांचा काढा ताप कमी करण्यासाठी उपयोगी, कंदांचा उपयोग डोकेदुखी, अर्धशिशी, मूत्रपिंडातील खडे आणि अतिघामावर




केला जातो. बियांचा उपयोग छातीचे विकार आणि मूत्रविकारांमध्ये केला जातो. आदिवासी भागात संधिवात, अतिसार आणि तापावर पारंपरिक औषध म्हणून वापर.

योग्य जमीन आणि हवामान : वालुकामय गाळाची, चांगला निचरा असलेली. सामू - ५.५ ते ७.०

तापमान - २५ ते ३५ अंश सेल्सिअस. वार्षिक पाऊस - ६०० ते ४५०० मिमी. सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध जमीन अधिक उत्पादन देते.

लागवडीची योग्य वेळ : करटोलीची लागवड साधारणपणे जून-जुलै महिन्यात पावसाळ्याच्या सुरुवातीला करावी. पहिली तोडणी ऑगस्ट अखेर. मुख्य उत्पादन सप्टेंबर ते ऑक्टोबर. एकदा लागवड केलेले कंद ४ ते ५ वर्षे उत्पादन देतात.

लागवडीच्या पद्धती : बियापासून - प्रति हेक्टर २.५ ते ५ किलो बियाणे, उगवण कमी असल्याने अधिक बियाणे आवश्यक. कंदांपासून - ही सर्वात चांगली पद्धत मानली जाते. प्रति हेक्टर २,५०० ते २,६५० कंद. यामध्ये २,२०० ते २,३०० मादी ३०० ते ३५० नर रोपे ८ मादी झाडांमागे १ नर झाड ठेवणे आवश्यक आहे. जमीन तयारी : खोल नांगरट करून दोन ते तीन वखरण्या द्याव्यात. शेवटच्या नांगरटीवेळी १५ ते २० टन कुजलेले शेणखत प्रति हेक्टर द्यावे. खड्ड्यांचा आकार - ५० बाय ५० बाय ५० सेंमी. अंतर - २ मीटर २ मीटर. खड्ड्यात २ भाग माती, १ भाग वाळू, १ भाग शेणखत यांचे मिश्रण भरावे. खत व्यवस्थापन : शेणखत १५ ते २० टन/हेक्टर. नत्र - १०० किलो. स्फुरद - ६० किलो. पालाश - ४० किलो. नत्र दोन हप्त्यांत द्यावे. अर्धे वाढीच्या अवस्थेत तर उर्वरित फुलोऱ्यापूर्वी.

पाणी व्यवस्थापन : लागवडीनंतर त्वरित पाणी द्यावे. उन्हाळ्यात आठवड्यातून १ ते २ वेळा सिंचन. पावसाळ्यात अतिरिक्त पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. पाणी साचल्यास कंद कुजण्याचा धोका असतो.

तण नियंत्रण : नियमित हाताने तण काढणी करावी. मुळे उथळी असल्यामुळे खोल निंदणी टाळावी.आधार व्यवस्थापन : करटुले ही वेलवर्गीय भाजी असल्यामुळे तिला आधार देणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी बांबू, लाकूड, लोखंडी तार, मंडप पद्धत यांचा वापर करता येतो. आधार दिल्यास वेलांची वाढ चांगली होते. फळांची गुणवत्ता सुधारते. उत्पादन वाढते.

कीड व्यवस्थापन : इपिलाक्ना भुंगा - यासाठी इमामेक्टिन बेंझोएट ५% २०० ग्रॅम/हेक्टर. फळमाशी - यासाठी फेरोमोन सापळे, खराब फळे नष्ट करणे.

निर्यातीची मोठी संधी : करटुले हे पारंपरिक असले तरी भविष्यातील उच्च मूल्याचे भाजीपाला पीक म्हणून उदयास येत आहे. पोषणमूल्ये, औषधी गुणधर्म, कमी उत्पादन खर्च, दीर्घ उत्पादन कालावधी आणि वाढती बाजारपेठ यामुळे हे पीक शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त उत्पन्नाचे प्रभावी साधन ठरू शकते. सुधारित वाण, कंदांपासून लागवड, योग्य नर-मादी प्रमाण, संतुलित खत व्यवस्थापन आणि शास्त्रीय पीक व्यवस्थापनाचा अवलंब केल्यास प्रति हेक्टर अधिक उत्पादन आणि चांगला आर्थिक लाभ मिळविणे शक्य आहे.



राज्य लोकतंत्र

# मराठवाडा वृत्तांत

रविवार दि.१९ जुलै २०२६ ५



# व्यापाऱ्याची पैशांची बॅग चोरी करणारे ४ आरोपी जेरबंद ५ लाखाचा मुद्देमाल जप्त

जालना। प्रतिनिधी

जालना शहरामध्ये जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस अधिक्षक श्री. तेगबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिसांना आदेश दिले होते त्या अनुषंगाने पोलिसांनी कारवाई केली याप्रकरणी उमेश बजाज, व्यापार, रा. फाईन सफायर, गोल्डन ज्युबली शाळेच्या पाठीमागे, जालना यांना नवीन मोंढा परिसरात अडवुन त्यांची रु.४,९६,०००/- रोख रक्कम असलेली पैशांची वैग तीन अनोळखी इसमांनी खंजर गळयाला जावुन जिवे मारण्याची धमकी देवुन हिस्कावुन घेतली व मोटार सायकलवरुन पळून गेले म्हणुन फिर्यादी यांच्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे चंदनझिरा येथे गुरनं. ४६८/२०२६ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.



सदर गुन्हयातील अनोळखी मोटार सायकल स्वारांचा शोध घेवुन गुन्हा तात्काळ उघड उघडकीस त्यानुषंगाने आरोपीतांचा तांत्रिक पुरावे व गोपनीय बातमीदारामार्फत माहिती घेत असतांना सदरचा गुन्हा अयान ऊर्फ पंच्यान्नव अमजद अली, वय-२० वर्ष, रा.हिंदनगर, जालना २) शेख उमर शेख रहिम, वय १८ वर्ष, रा. गुंडेवाडी, जालना ३) शेख अब्दुल शाहिद ऊर्फ मीटर शेख रशिद, वय-२० वर्ष, रा. हिंदनगर, जालना यांनी केला असुन व्यापाऱ्याकडे पैसे असल्याबाबत आरोपी आरिफ रहिमोद्दीन अन्सारी, वय-२८ वर्ष, रा. हिंदनगर, जालना याने पुरविली होती. त्यामुळे त्यांना ताब्यात घेण्यात आले व वरील प्रमाणे गुन्हा उघड करण्यात आला आहे. आरोपी अयान ऊर्फ पंच्यान्नव अमजद अली, वय-२० वर्ष, रा. हिंदनगर, शेख उमर शेख रहिम, वय १८ वर्ष, रा. गुंडेवाडी, जालना शेख अब्दुल शाहिद ऊर्फ मीटर शेख रशिद, वय-२० वर्ष, रा. हिंदनगर, जालना आरिफ रहिमोद्दीन अन्सारी, वय-२८ वर्ष, रा. हिंदनगर, जप्त मुद्देमाल:- १ रु.४.८१,५००/-/- किंमतीची रोख रक्कम २ रु.५०,०००/- किंमतीची गुन्हयात वापरलेली हिरो होंडा स्प्लेंडर मोटार सायकल ३ रु.४०,०००/- किंमतीचे गुन्हा करतांना वापरलेले ०४ मोबाईल ४ रु.१०००/- किंमतीचा एक खंजर ५ रु.००/- किंमतीची फिर्यादीची सँग एकुण रु.५,७२,५००/- कारवाई करणारे अधिकारी व अंमलदार सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू , मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी , मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग जालना श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी कारवाई केली.

# ६० खासगी बसेसची तपासणी व २६ वाहनांवर कारवाई १ लाख ९० हजाराचा दंड वसूल

जालना। प्रतिनिधी

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मनीष दौंड यांच्या मार्गदर्शनाखाली उप प्रादेशिक परिवहन कार्यालय. जालना यांच्या वायुवेग पथकाने विशेष तपासणी मोहीम राबवून एकूण ६० बसेसची तपासणी केली. सदर कारवाईत मोटार वाहन निरीक्षक फारुक एस. शेख, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अभिजित के. बावसकर तसेच वाहन चालक ज्ञानेश्वर निळे यांनी तपासणी दरम्यान २६ बसेसमध्ये मोटार वाहन कायद्याचे विविध उल्लंघन आढळून आले.

त्यामध्ये प्रामुख्याने विनापरवाना वाहतूक. मोटार वाहन कर न भरणे इंडिकेटर टेल लाइट बंद असणे, केबिनमध्ये अनधिकृत प्रवासी वाहतूक करणे तसेच वाहनाच्या टपावर माल वाहतूक करणे अशा गंभीर स्वरूपाच्या त्रुटींचा समावेश होता.

सदर उल्लंघनांबाबत संबंधित वाहनांवर मोटार वाहन अधिनियम, १९८८ व संबंधित नियमांनुसार कारवाई करण्यात आली असून



एकूण १ लाख ९० हजार इतका दंड वसूल करण्यात आला आहे.उप प्रादेशिक परिवहन कार्यालय यांच्यामार्फत सर्व बसचालक वाहनमालक तसेच प्रवासी वाहतूक व मालवाहतूक करणाऱ्या वाहनधारकांना आवाहन करण्यात येते की. रस्ते सुरक्षितता, प्रवाशांची सुरक्षितता आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांविरुद्ध अशाच प्रकारे सातत्याने कठोर कारवाई करण्यात येणार आहे. अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मनिष दौंड यांनी दिली आहे.

# तांदळा येथे महिला शेती शाळा व प्रशिक्षण




मादळमोही । प्रतिनिधी

हवामान बदलाशी जुळवून घेणाऱ्या शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी, येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा - टप्पा २) आणि कापूस उत्पादकता अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला शेती शाळा व विशेष प्रशिक्षण वर्ग' उत्साहात संपन्न झाला. सदर कार्यक्रम तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी गावातील व परिसरातील महिला शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे गिरवले.

वरिष्ठ अधिकारी व तज्ज्ञांची लाभली उपस्थिती या प्रशिक्षण वर्गाला कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यामध्ये:गांवच्या प्रथम नागरीक संरपंच सौ, सोनाली गवते माधुरी माळी(मंडळ कृषी अधिकारी) राजेंद्र सांगळे (उपकृषी अधिकारी) के. के. पवार (सहाय्यक कृषी अधिकारी) ईश्वर शिंदे (समूह सहाय्यक) अमोल मिसाळ, ( समूह सहाय्यक) ज्ञानेश्वर राठोड उपस्थित सर्व अधिकाऱ्यांनी महिला शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत कापूस उत्पादकता वाढवण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

कापूस उत्पादकता वाढवणे हेच मुख्य उद्दिष्ट सद्यस्थितीत बदलत्या हवामानाचा कापूस पिकावर होणारा परिणाम आणि त्यावर करावयाच्या उपाययोजना यावर या शेती शाळेत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर तंत्रज्ञान समजावून सांगण्यात आले. एकात्मिक कीड व्यवस्थापन कपाशीवरील गुलाबी बोंडअळी व इतर रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी कामगंध सापळे आणि पिवळे चिकट सापळे वापरण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. संतुलित खत व पाणी व्यवस्थापन: जमिनीची सुपीकता टिकवून ठेवून योग्य प्रमाणात खतांचा वापर कसा करावा आणि कोरडवाहू भागात कपाशीला संवेदनशील अवस्थेत ओलावा कसा टिकवून ठेवावा, याचे मार्गदर्शन करण्यात आले. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (टप्पा-२) चा लाभ नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत महिला शेतकऱ्यांचा सहभाग वाढवण्यावर विशेष भर दिला जात आहे. महिलांना शेतीमध्ये आत्मनिर्भर बनवणे आणि आधुनिक तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत थेट पोहोचवणे हा या शेती शाळेचा मुख्य हेतू आहे. पोकरा योजनेअंतर्गत मिळणारे विविध अनुदान,बियाणे, किटकनाशक,शेती अवजारे आणि नवीन उपक्रमांची माहितीही या वेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी दिली. केवळ वर्गखोलीत मार्गदर्शन न करता, उपस्थित अधिकारी आणि महिला शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष कपाशीच्या शेतात जाऊन पाहणी केली. झाडाची निरीक्षणे कशी घ्यावीत, मित्रकीड आणि शत्रूकीड यातील फरक कसा ओळखावा, याचे थेट प्रात्यक्षिक समूह सहाय्यक व कृषी सहाय्यकांनी महिलांना करून दाखवले. "पूर्वी शेतीमध्ये महिलांचा वाटा फक्त मजुरीपुरता मर्यादित असायचा, परंतु काही विभागाच्या माध्यामातून महीला शेतकरी बचत गटानी ऑनलाईन केल्या गांवात ९ गटाने १००० कापुस बॅग मिळाल्याने महिला शेतकरी यांचे सक्षमीकरण अशा शेती शाळांमुळे आणि कृषी अधिकाऱ्यांच्या थेट मार्गदर्शनामुळे आता आम्ही स्वतः निर्णय घेऊन आधुनिक पद्धतीने कपाशीचे व्यवस्थापन करू शकत आहोत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी मानले. तांदळा गांवातील बचत गटाच्या महिला शेतकऱ्यांसाठी आयोजित केलेल्या या अत्यंत उपयुक्त उपक्रमाबद्दल ग्रामस्थांनी व शेतकरी वर्गाने तालुका कृषी अधिकारी कार्यालय आणि संपूर्ण टीमचे विशेष कौतुक केले आहे.

# स्व. गजानन तौर फाऊंडेशनच्या रक्तदान शिबिरात तब्बल ५०९ जणांचे रक्तदान

जालना। प्रतिनिधी

स्व. गजानन तौर यांच्या स्मृतिदिनानिमित्त स्व. गजानन तौर फाऊंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय सामाजिक उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाजसेवेचा वारसा जपत आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात तब्बल ५०९ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला. त्यामुळे जिल्ह्यातील रक्तपेढ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, गरजू रुग्णांसाठी मोठ्या प्रमाणात रक्तसाठा उपलब्ध झाला आहे. १७ जुलै रोजी आयोजित अभिवादन कार्यक्रम व भव्य रक्तदान शिबिराला विविध क्षेत्रांतील मान्यवर, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि शेकडो नागरिकांची उपस्थिती लाभली. यावेळी आ. नारायण कुचे, आ. हिकमत उढाण,



भाजपाचे महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांच्यासह फाऊंडेशनच्या अध्यक्षा कल्याणी तौर यांच्यासह अनेकांनी उपस्थित राहून स्व. गजानन तौर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण केली.

यंदा रक्तदानासाठी युवकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाल्याने रक्तसंकलनाची व्यवस्था अधिक सक्षम करण्यात आली होती. एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणावर रक्तसंकलन करण्यासाठी सहा रक्तपेढ्यांच्या डॉक्टर व वैद्यकीय पथकांनी सहभाग घेतला. यामध्ये श्री स्वामी समर्थ रक्तसंकलन केंद्र, वरद रक्तसंकलन केंद्र (धुळे), जिल्हा सामान्य रुग्णालय जालना, बदनापूर रक्तपेढी, नूर हॉस्पिटल बदनापूर आणि राज्य रक्त संक्रमण केंद्र यांच्या माध्यमातून रक्तसंकलन करण्यात आले. शिबिरात सहभागी झालेल्या प्रत्येक रक्तदात्याचा झाड देऊन सन्मान करण्यात आला. युवक, महिला तसेच प्रथमच रक्तदान करणाऱ्या तरुणांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान असल्याची भावना व्यक्त करत अनेकांनी नियमित रक्तदानाचा संकल्पही केली, विविध सामाजिक संस्था, व्यापारी, उद्योगपती, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्व. गजानन तौर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी रक्तदान शिबिरासह आरोग्य, शिक्षण, सामाजिक जनजागृती आणि जनहिताचे विविध उपक्रम राबविले जातात. समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत सेवाभावी कार्यातून त्यांची आठवण जिवंत ठेवण्याचा फाऊंडेशनचा प्रयत्न असल्याचे कल्याणी तौर यांनी सांगितले.

# आषाढी वारीत सार्वजनिक आरोग्य विभागाची अहोरात्र सेवा

हिंगोली। प्रतिनिधी

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने उभारलेली आरोग्य यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत असून, १५ जुलैपर्यंत तब्बल ३ लाख १५ हजार २१ वारकऱ्यांना बाह्यरुग्ण (ओपीडी) सेवा देण्यात आली आहे. याशिवाय २ हजार ७६१ रुग्णांवर दाखल करून उपचार करण्यात आले असून ६२० रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले आहे.

'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या संकल्पनेतून सार्वजनिक आरोग्य विभागाने पालखी मार्गावरील प्रत्येक वारकऱ्यापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचे नियोजन यशस्वीपणे राबविले आहे. पालखी मार्गावरील आरोग्य केंद्रे, रुग्णवाहिका, आयसीयू सुविधा, बाईक ॲम्बुलन्स, 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' केंद्रे आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून भाविकांना तात्काळ उपचार उपलब्ध करून दिले जात आहेत. यावेळी वारीदरम्यान ताप, श्वसनविकार, अतिसार, उच्च रक्तदाब, मधुमेह यांसारख्या विविध आरोग्य समस्यांवर त्वरित उपचार करण्यात येत आहेत. १५ जुलैपर्यंत १९ हजार ३६ तापाच्या रुग्णांवर, ११ हजार ३०४ श्वसन संसर्गाच्या रुग्णांवर, ६ हजार २४५ उच्च रक्तदाब, ५ हजार ४६९ मधुमेह तसेच ९ हजार ९७७ अतिसाराच्या रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. आपत्कालीन परिस्थितीत रस्ते अपघात, हृदयविकार आणि इतर गंभीर रुग्णांनाही तत्काळ वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आली.

वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाचे ३,०८७ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच ३०२ तज्ज्ञ डॉक्टर अहोरात्र कार्यरत आहेत. यंदाच्या वारीत प्रथमच गंभीर रुग्णांसाठी एअर ॲम्बुलन्स सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, 'आरोग्यसंपन्न वारी' मोबाईल ॲपद्वारे पालखी मार्गावरील आरोग्य सुविधा, उपचार केंद्रे, रुग्णवाहिका आणि तातडीच्या वैद्यकीय सेवांची माहिती वारकऱ्यांना सहज उपलब्ध होत आहे.

# खर्डा ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन; तीन स्वतंत्र ग्रामपंचायतींची निर्मिती

## प्रा. राम शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश; शासनाची अधिसूचना जारी

जामखेड। प्रतिनिधी

जामखेड तालुक्यातील खर्डा ग्रुप ग्रामपंचायतीचे अखेर विभाजन करण्यात आले असून खर्डा, नागोबाचीवाडी आणि पांढरवाडी या तीन स्वतंत्र ग्रामपंचायती अस्तित्वात आल्या आहेत. याबाबत ग्रामविकास विभागाची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे.शासनाच्या अधिसूचनेनुसार, नव्याने स्थापन करण्यात आलेल्या खर्डा ग्रामपंचायतीमध्ये खर्डा महसुली गाव, नागोबाचीवाडी ग्रामपंचायतीमध्ये नागोबाचीवाडी व मुंगेवाडी, तर पांढरवाडी ग्रामपंचायतीमध्ये पांढरवाडी व दरडवाडी या महसुली गावांचा समावेश करण्यात आला आहे. ही अधिसूचना १७ जुलै २०२६ पासून लागू करण्यात आली आहे.

खर्डा ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करून स्वतंत्र ग्रामपंचायती स्थापन करण्याची मागणी ग्रामस्थांकडून अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. नागरिकांच्या मागणीची दखल घेत हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी ग्रामविकास विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे.

या निर्णयामुळे स्थानिक पातळीवरील प्रशासन अधिक सक्षम होणार असून नागरिकांना शासकीय योजना, नागरी सुविधा आणि विकासकामांचा लाभ अधिक प्रभावीपणे मिळण्यास मदत होणार आहे.''ग्रामस्थांच्या मागणीचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. नव्या ग्रामपंचायतींमुळे परिसरातील विकासाला अधिक गती मिळेल आणि नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध होतील,'' असे विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले.

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-९०५**
**दिनांक - १७/०७/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती नंदकुमार सिताराम चिंचखेडे रा. विठ्ठलवाडी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | मयुरी नंदकुमार चिंचखेडे | मुलगी | ०९/१२/२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१७/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-९०२**
**दिनांक - १६/०७/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती श्रीकृष्ण ज्ञानदेव गर्जे रा. भगवानगर महाकाळा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | वेदांत श्रीकृष्ण गर्जे | मुलगा | २५/०८/२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१६/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

# खोटी माहिती व एनसीआर करून बदनामी प्रकरणी अंदुरे याच्यावर कायदेशीर गुन्हा दाखल करण्याची मागणी !

पाथर्डी प्रतिनिधी

दैनिक राज्य लोकतंत्रचे पाथर्डी तालुका प्रतिनिधी प्रा. दादासाहेब विष्णू खेडकर (रा. मालेवाडी, पो. खरवंडी कासार) यांनी खरवंडी कासार येथील कृष्णनाथ गणपत अंदुरे यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात दिलेल्या एनसीआर तक्रारीवर आक्षेप घेत, ती पूर्णपणे खोटी व दिशाभूल करणारी असल्याचा आरोप केला आहे. तसेच या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

प्रा. खेडकर यांनी दिलेल्या निवेदनानुसार, दि. १४ जुलै २०२६ रोजी दैनिक राज्य लोकतंत्रमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या अनुषंगाने कृष्णनाथ अंदुरे यांनी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम २५६(२) व २५२ अन्वये एनसीआर तक्रार दाखल केली. मात्र, या तक्रारीतील अनेक बाबी वस्तुस्थितीविरुद्ध असल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ लगत असलेले पूर्णब्रह्म हॉटेल हे कृष्णनाथ अंदुरे यांचे नसून त्याचे मूळ मालक सुनील साहेबराव अंदुरे आहेत. हे हॉटेल गट क्रमांक ८८ मधील जागेवर असून संबंधित जमिनीचे भूमीअधिग्रहण राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने केले असून त्याबाबत शासनाकडून मोबदला देण्यात आल्याची माहिती आहे. तसेच हॉटेलचा काही भाग अतिक्रमित असल्याची माहिती असल्याने त्याचीही फेरपडताळणी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. प्रा. खेडकर यांनी पुढे म्हटले आहे की, एनसीआर तक्रारीत स्वतःला हॉटेलचा मालक असल्याचा दावा करताना कृष्णनाथ अंदुरे यांनी माझ्यावर रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचा, शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना धमकावल्याचा, प्रशासनाविरोधात भडकाऊ बातम्या देण्याचा, सामान्य नागरिकांना त्रास देण्याचा तसेच बातम्यांच्या आडून हप्ते घेण्याचा आरोप केला आहे. हे सर्व आरोप निराधार असून माझी जाणीवपूर्वक बदनामी करण्याच्या उद्देशाने करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. पत्रकार म्हणून काम करताना माझ्याविरोधात दोन प्रकरणे दाखल असली तरी ती न्यायप्रविष्ट असून कोणत्याही न्यायालयाने मला गुन्हेगार ठरविलेले नाही. त्यामुळे लेखी तक्रारीत मला थेट गुन्हेगार ठरविणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

गट क्रमांक ८८ चा सातबारा व इतर महसुली नोंदींची पडताळणी करून पूर्णब्रह्म हॉटेलचे मूळ मालक निश्चित करावेत. तसेच पोलीस प्रशासनाला खोटी व दिशाभूल करणारी माहिती देऊन स्वतःची बदनामी केल्याप्रकरणी कृष्णनाथ गणपत अंदुरे यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता तसेच लागू असलेल्या पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा, अशी मागणी प्रा. दादासाहेब खेडकर यांनी केली आहे.

## दादासाहेब खेडकर यांना जीवे मारण्याची धमकी

१४ जुलै २०२६ रोजी दैनिक राज्य लोकतंत्र वर्तमानपत्रात अन्न व औषध प्रशासनाने खरवंडी कासार येथील काही हॉटेलवर धाडी मारल्या ही घटना सत्य असून, यामधील वर्तमानपत्रात हॉटेलचे नाव आल्याने याचा द्वेष मनात ठेवून अमोल बटुळे या गुंडाने फोनवरून पत्रकार दादासाहेब खेडकर यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करत तोंडातून रक्तपात करत हातपाय तोडून जीवे मारण्याची धमकी दिली यामुळे पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. तसेच मी कुणाचीही वैयक्तिक बदनामी केली नसल्याने कुणाचीही माफी मागणार नाही असेही ठाम मत पत्रकार दादासाहेब खेडकर यांनी व्यक्त केले आहे.

# नागरिकांनी सवलतीच्या दरातील रोपांचा लाभ घेऊन वृक्ष लागवड करावी - जिल्हाधिकारी

## सवलतीच्या दरात रोपविक्रीला ११ तालुक्यात प्रारंभ * हरित बीड, समृद्ध बीड तसेच एक पेड माँ के नाम अभियान

बीड । प्रतिनिधी

वनमहोत्सव २०२६ च्या निमित्त बीड सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने जिल्हाभरात सवलतीच्या दरात रोपविक्रीला प्रारंभ करण्यात आला आहे. तरी नागरिकांनी सवलतीच्या दरातील रोपांचा लाभ घेऊन मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करावी व त्यांचे संवर्धन करावे आणि हरित बीड, समृद्ध बीड तसेच एक पेड माँ के नाम या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते रोपविक्री स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी





### सामाजिक वनीकरण विभागाने केली २० लाख रोपांची निर्मिती

उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, विभागीय वन अधिकारी श्रीनिवास लखमावाड, सहायक वनसंरक्षक उमेश बिराजदार, वनपरिक्षेत्र अधिकारी समाधान सानप तसेच विभागातील अधिकारी- कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते. राष्ट्रीय वन धोरण १९८८ नुसार देशाच्या भौगोलिक क्षेत्रापैकी किमान ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित असणे अपेक्षित आहे. मात्र सध्या हे प्रमाण २१.२५ टक्के असल्याने वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाची गरज अधिक तीव्र झाली आहे. वाढते तापमान, बदलते पर्जन्यमान आणि पर्यावरणीय असमतोल लक्षात घेता मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करणे ही काळाची गरज असल्याचे प्रशासनाने नमूद केले. दरवर्षी १५ जून ते ३० सप्टेंबर हा कालावधी वनमहोत्सव म्हणून साजरा केला जातो. या कालावधीत नागरिकांना वृक्षलागवडीसाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून शासनाकडून सवलतीच्या दरात विविध प्रजातींची रोपे उपलब्ध करून दिली जात आहेत.

सामाजिक वनीकरण विभागाने यावर्षी सुमारे २० लाख रोपांची निर्मिती केली असून त्यामध्ये नीम, वड, पिंपळ, उंबर, बेल, कवठ, साग, शिसू, हिरडा, बेहडा, करंज, कांचन, आवळा, पेरू, सिताफळ यांसह ४० ते ५० स्थानिक प्रजातींचा समावेश आहे. अशी माहिती सहायक वनसंरक्षक उमेश बिराजदार यांनी यावेळी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील रोपविक्री स्टॉल पुढील दोन आठवडे सुरू राहणार असून बीएसएनएल कार्यालय परिसरातील स्टॉल १५ जून ते ३० सप्टेंबर या संपूर्ण वनमहोत्सव कालावधीत सुरू राहणार आहे. तसेच सामाजिक वनीकरण विभागाच्या बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांच्या मुख्यालयांवर ही रोपविक्री केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या जवळच्या रोपविक्री केंद्राला भेट देऊन सवलतीच्या दरातील रोपे खरेदी करावीत आणि पर्यावरण संवर्धनाच्या या लोकचळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय वन अधिकारी श्रीनिवास लखमावाड यांनी केले आहे.

# वैद्यनाथ विद्यालयातील विद्यार्थ्यांचे आंदोलन, शिक्षणाधिकाऱ्यांच्या भूमिकेवर संताप

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी शहरातील तब्बल ५० वर्षांची शैक्षणिक परंपरा लाभलेल्या नामांकित श्री वैद्यनाथ विद्यालयातील शैक्षणिक व प्रशासकीय व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचा आरोप होत आहे. शिक्षकांची तीव्र कमतरता, अनेक शिक्षक नियमितपणे अध्यापनासाठी उपस्थित नसणे, रखडलेले वेतन आणि नियमित मुख्याध्यापकांचा अभाव यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम झाला असून, अखेर संतप्त विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.



### विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ थांबवा-नगरसेवक बागवाले

५० वर्षांची गौरवशाली परंपरा असलेल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मूलभूत हक्कासाठी आंदोलन करावे लागणे ही शिक्षण व्यवस्थेची मोठी शोकांतिका आहे. प्रशासनाने तातडीने शिक्षकांची रिक्त पदे भरावीत, रखडलेले वेतन अदा करावे, नियमित मुख्याध्यापकांची नियुक्ती करावी आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबवावे. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्ष विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी अधिक तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा गटनेते नितीन बागवाले यांनी दिला.

या आंदोलनाची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे परळी नगरपरिषदेचे गटनेते नितीन बागवाले यांनी आंदोलनस्थळी भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेतल्यानंतर त्यांनी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. मात्र, या चर्चेदरम्यान शिक्षणाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत ◀◀ पान ३ वर

# छाया पांचाळ ते मुस्कान... बीड जिल्हा रुग्णालयात प्रसूतीदरम्यान मातामृत्यूंची मालिका?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयातील प्रसूतीदरम्यान झालेल्या मातामृत्यूंच्या घटनांबाबत संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, तसेच माता व बाल रुग्णालयातील विविध त्रुटींची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, या मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी मुख्यमंत्री, पालकमंत्री सुनेत्रा पवार, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव व आरोग्य सेवा संचालनालयाकडे लेखी तक्रार केली आहे. या मागण्यांसाठी दि. २० जुलै (सोमवार) रोजी जिल्हा रुग्णालय परिसरात आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

### २४ कोटींच्या माता-बाल रुग्णालयातील अनागोंदी

डॉ. ढवळे यांनी निवेदनात आरोप केला आहे की, जिल्हा रुग्णालयातील कथित हलगर्जीपणामुळे प्रसूतीदरम्यान छाया गणेश पांचाळ तसेच अलीकडील मुस्कान यांच्या मृत्यूची प्रकरणे घडली असून, संबंधितांवर अद्याप गुन्हे दाखल झालेले नाहीत. समित्यांवर समित्या नेमून वेळकाढूपणा केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला

छाया गणेश पांचाळ व मुस्कान मृत्यूप्रकरणी संबंधित दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.

चौकशीच्या नावाखाली होत असलेल्या दिरंगाईबाबत जबाबदार अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी.संबंधित चौकशी समित्यांची निष्पक्ष पुनर्रचना करावी.मृत्यू प्रकरणांतील जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई करावी.

**२४ कोटींच्या माता-बाल रुग्णालयातील त्रुटींची चौकशीची मागणी**

डॉ. ढवळे यांनी निवेदनात २४ कोटी रुपये खर्चून उभारलेल्या माता व बाल रुग्णालयातील कथित त्रुटींकडेही लक्ष वेधले आहे. इमारतीला गळती लागणे, वारंवार लिफ्ट बंद पडणे, स्ट्रेचर सुविधेचा अभाव, रुग्णांना नातेवाईकांकडून उचलून न्यावे लागणे, तसेच बांधकामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या सर्व बाबींची स्वतंत्र चौकशी करून कंत्राटदार व संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# ग्रामीण भागातही पतसंस्थेकडून लूटमार

## पतसंस्थेच्या अजब कारभाराविरुद्धचे उपोषण कारवाईच्या आश्वासनानंतर मागे

बीड । प्रतिनिधी

बिगर शेती पतसंस्थेने दिलेले कर्ज पडल्यानंतरही जास्तीचे कर्ज दिल्याचे दाखवून बोगस कर्ज फेडण्यासाठी शारिरीक आणि मानसिक छळ होत असल्याने चकलांबा येथील ज्येष्ठ आणि विष्णू मारुती खेडकर यांनी सुरू केलेले उपोषण अखेर सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांनी चौकशी करून न्याय देण्याच्या आश्वासनानंतर मागे घेण्यात आले.



यासंदर्भात माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील रोकडेश्वर बिगर शेती पतसंस्थेने विष्णू मारुती खेडकर यांना १३,०००/ रुपयाचे कर्ज दिले होते. सदर कर्ज काढण्यात आल्यानंतर पट संस्थेत कर्ज रकमेचा भरणा करण्यात आला. तथापि पतसंस्थेने १ लाख ८१ हजार १०५ रुपयांची वसुली नोटीस पाठविण्यात आली होती. वारंवार करण्यात आलेल्या एखाद्यामुळे ज्येष्ठ नागरिक तथा वयोवृध्द विष्णू खेडकर यांना शारीरिक आणि मानसिक त्रास झाल्याने त्यांनी पतसंस्थेच्या दारात दिनांक १५ रोजी लोकशाही मार्गाने उपोषण सुरू केले. या संदर्भात चौकशी करून कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर सदर उपोषण मागे घेण्यात आले.

दरम्यान रोकडेश्वर पतसंस्थेच्या चालकांनी नियम धाब्यावर बसून मोठे ◀◀ पान ३ वर



**माजलगाव:- येथील जिल्हा वकील संघ माजलगाव येथे लोकशाहीर साहित्यरत्न कॉम्रेड अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनी अभिवादन करण्यात आले यावेळी वकील संघाचे अध्यक्ष भाई ॲड नारायण गोले पाटील,उपाध्यक्ष ॲड राहुल बजाज,सचिव ॲड नारायण तेलगड,ॲड मच्छिंद्र डोंगरदिवे, ड.एन एस सय्यद,ॲड एस डी कांबळे, ॲड डी डी ढाकणे,ड एम एस कुंभार, ॲड. बि. के. तेरकर, ॲड. डि एच कसबे आदी वकील बांधवांची उपस्थिती होती.**

# वडवणी मध्ये निष्ठेचा 'टॅटू' पॅटर्न; घरवापसीच्या चर्चांमध्ये कार्यकर्त्याचा अनोखा बाणा!

वडवणी प्रतिनिधी

बीड जिल्हा हा महाराष्ट्राच्या राजकारणात नवी समीकरणे आणि नेतृत्व घडवणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी एका सामान्य ऊसतोड मजुराचा मुलगा ते राज्याचे उपमुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री असा संघर्षमय प्रवास याच मातीतून केला. स्वर्गीय मुंडे साहेबांचा हाच वारसा आणि त्यांच्याशी असलेले जुने ऋणानुबंध बीडच्या राजकारणात आजही तितकेच घट्ट आहेत, याचा प्रत्यय नुकताच वडवणी तालुक्यात आला आहे.



वडवणीतील ज्येष्ठ नेते फुलचंद (बाबरी) मुंडे यांच्यावरील निष्ठा व्यक्त करण्यासाठी त्यांच्या एका कट्टर कार्यकर्त्याने थेट आपल्या हातावर नेत्याचा चेहराच टॅटूच्या रूपाने कोरला आहे.

वडवणी तालुक्याच्या राजकारणातील भीष्माचार्य म्हणून ओळखले जाणारे राजेभाऊ अण्णा मुंडे यांचे सुपुत्र फुलचंद (बाबरी) मुंडे हे प्रदीर्घ काळ स्वर्गीय मुंडे साहेबांसोबत आणि पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये सक्रिय होते. मात्र, गेल्या वर्षी त्यांनी आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार गट) प्रवेश केला होता. अजितदादांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रवेशानंतर बीडच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली होती.

दरम्यान, अजित पवार यांच्या आकस्मिक अपघाती निधनानंतर आणि बदललेल्या राजकीय परिस्थितीत, काही दिवसांपूर्वीच बाबरी मुंडे यांनी आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या समवेत पंकजाताई मुंडे यांची भेट घेतली. या भेटीनंतर जिल्ह्यात बाबरी मुंडे यांच्या 'घरवापसी'च्या चर्चांना उधाण आले आहे. एकीकडे राजकीय वर्तुळात या चर्चा रंगल्या असताना, दुसरीकडे त्यांच्या कार्यकर्त्यांमधील क्रेझ मात्र तसूभरही कमी झालेली नाही.

बाबरी मुंडे यांचा कार्यकर्त्यांमध्ये खूप मोठा वर्ग आहे. त्यांच्या ◀◀ पान ३ वर

# बेलेश्वर संस्थानच्या श्रीगुरू ईश्वरबाबा भारती पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानच्या श्रीगुरू ईश्वरबाबा भारती पायी दिंडीचे आषाढी वारीसाठी श्रीक्षेत्र पंढरपूरकडे आज (दि. १७) शुक्रवार रोजी सकाळी ११ वाजता भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती प.पू. महंत महादेव भारती महाराज व ह.भ.प. शांतीब्रह्म तुकाराम भारती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या या दिंडीत सुमारे दोन हजार वारकरी सहभागी झाले होते.

टाळ-मृदंगाच्या गजरात ज्ञानबा-तुकारामच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. वारकऱ्यांच्या डोक्यावर तुळशीवृंदावन, हातात भगव्या पताका आणि मुखी विठ्ठलनाम असा भक्तिरसाने ओथंबलेला सोहळा अनुभवायला मिळाला. पायी दिंडीचे हे चौथे वर्ष असून पहिल्या वर्षी ४००, दुसऱ्या वर्षी १,१००, तिसऱ्या वर्षी १,५०० तर यंदा तब्बल ३,००० वारकरी सहभागी झाले. यंदा पावसाची चिंता असली तरी पंढरपूरच्या विठ्ठलावर सर्व सोपवुन दिंडीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची संख्या वाढल्याचे दिसून

दिंडी लिंबागणेश येथे दाखल होताच ग्रामस्थांनी मुख्य प्रवेशद्वारावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आतषबाजी करून उत्साहात स्वागत केले. सुवासिनींनी औक्षण केले, मार्गावर ठिकठिकाणी आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या तसेच पायघड्या अंथरून वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. गावातील वातावरण विठ्ठलनामाच्या जयघोषाने आणि टाळ-मृदंगाच्या निनादाने भक्तिमय झाले होते ◀◀ पान ३ वर

# ग्रामीण भागातील फेटा घालणारी ही शेवटची पिढी

ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव

ग्रामीण भागातील फेटा घालणारी शेवटची पिढी' ही अशी पिढी आहे, जी रोजच्या कामात,शेतात किंवा सार्वजनिक आयुष्यात नित्यनियमाने साधे सुती किंवा पांढरे फेटे वापरायची.ही संस्कृती आता हळूहळू लोप पावत चालली आहे. ग्रामीण भागात फेटा बांधणे हा मान, सन्मान आणि संस्कृतीचा मुख्य भाग आहे.फेटा हा डोक्याचे रक्षण करण्यासोबतच व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात भारदस्तपणा आणतो.





पूर्वीच्या पिढीतील (विशेषतः ६० वर्षांवरील) आजोबा शेतात जाताना कडक उन्हापासून संरक्षण म्हणून डोक्यावर 'पंचा' किंवा 'फेटा' घट्ट बांधायचे. आताची तरुण पिढी दैनंदिन कामात फेट्याऐवजी टोपी (कॅप) किंवा रुमाल वापरताना दिसते.आज ग्रामीण भागात फेटा घालणे हे दैनंदिन जीवन न राहता केवळ सण, उत्सव,लग्नकार्य, किंवा राजकीय कार्यक्रमापुरते मर्यादित राहिले आहे.याला फॅशन किंवा संस्कृतीचे प्रतीक म्हणून पाहिले जाते.ही शेवटची पिढी आपल्यासोबत फेटा बांधण्याची पारंपरिक कला

### स्वाभिमान आणि ओळख

ग्रामीण भागात वयोवृद्ध व्यक्तींचा सन्मान 'फेटा किंवा पटका बांधून' केला जातो. हा शिरपेच त्यांच्या वयाचा आणि अनुभवाचा आदर असतो. बदलती जीवनशैली: आजच्या आधुनिक युगात फॅशनेबल टोपी, पांढऱ्या किंवा काळ्या टोप्यांचा वापर वाढला आहे. त्यामुळे तरुण पिढीने पटका घालणे जवळपास सोडले आहे.

### सांस्कृतिक वारसा

सण, उत्सव, लग्नसमारंभ आणि जत्रांमध्येच आता फेटा किंवा पटका पाहायला मिळतो, जो या संस्कृतीची आठवण करून देतो.ही पिढी काळाच्या ओघात मागे पडत असली, तरी त्यांनी जपलेली ही परंपरा महाराष्ट्राची खरी ओळख आहे.

आणि ग्रामीण जीवनशैलीची आठवण घेऊन जात आहे,ज्याचे जतन करणे काळाची गरज बनली आहे.दैनंदिन फेटे बांधण्याची कला आता कमी झाली आहे. त्याऐवजी ◀◀ पान ३ वर

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना माजलगाव नगर परिषदेतील गैरव्यवहाराबाबत साळवे यांचे निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील नगर परिषदेतील कथित गैरव्यवहार, बनावट कागदपत्रे, खोट्या स्वाक्षऱ्या आणि अभिलेखांमध्ये फेरफार केल्याच्या आरोपांबाबत रिपब्लिकन पक्षाच्या वतीने उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनात संबंधित प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नगर परिषदेतील लिपिक शिवहर शेटे, विघ्नेश मुंडे आणि अक्षय धारक यांच्यावर गुंठेवारी व मालमत्ता प्रकरणांमध्ये बनावट आदेश तयार करणे, खोट्या स्वाक्षऱ्या करून प्रमाणपत्रे देणे, अभिलेखांमध्ये फेरफार करणे तसेच विविध नोंदींमध्ये खाडाखोड केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या प्रकारामुळे शासनाची दिशाभूल झाली असून नागरिकांचीही फसवणूक झाल्याचा दावा करण्यात आला आहे.तसेच पी.टी.आर., गुंठेवारी, मालमत्ता नोंदी आणि इतर शासकीय अभिलेखांमध्येही नियमबाह्य बदल केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या सर्व प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमान्वये गुन्हे दाखल करावेत, शासनाचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूल करावे तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधितांना निलंबित करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, निवेदनातील . या प्रकरणातील आरोपांची सत्यता सक्षम यंत्रणेकडून होणाऱ्या चौकशीनंतरच स्पष्ट होईल मात्र या निवेदनामुळे माजलगाव नगर परिषदेतील गैरव्यवहाराचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून शासन या प्रकरणात कोणती भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. लवकरच या दोषीवर कारवाई नाही झाल्यास पीपल्स पार्टीचे तालुकाध्यक्ष राकेश साळवे, विधानसभा अध्यक्ष सिद्धार्थ ससाणे,सह कार्यकर्ते लोकशाही मार्गाने उपोषण करण्यात येईल असा इशारा दिला आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26